
रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १५ ◆ अंक ३२८
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, १६ जून २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
कामोठ्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान/३
रोह्यातील वैशालीनगरवासीयांचे पाण्यासाठी धरणे आंदोलन/५
आशिया चषक स्पर्धेचा ३१ ऑगस्टपासून थरार/८

## बिपरजॉय चक्रीवादळ गुजरात किनारपट्टीवर धडकले



**कच्छ (गुजरात)** : ज्याची गेले अनेक दिवस चर्चा होती ते बिपरजॉय चक्रीवादळ गुरुवारी (दि. १५) गुजरात किनारपट्टीवर धडकले. त्यामुळे तेथे ताशी १३० किमीच्या वेगाने वारे वाहत होते. त्याचप्रमाणे पाऊसही सुरू झाला. दरम्यान, केंद्र सरकारतर्फे किनारी भागांत लष्कर, एनडीआरएफसह सर्व यंत्रणा तैनात करण्यात आल्या आहेत. केंद्र व राज्य सरकारचे मंत्रीही या वादळावर लक्ष ठेवून आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी तेलंगणचा दौरा रद्द केला आहे. भारतीय हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार बिपरजॉय चक्रीवादळ गुजरातमधील सौराष्ट्र, कच्छ आणि जखाऊ बंदरांना धडकून नंतर पाकिस्तानच्या दिशेने जाईल. त्यामुळे नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे तसेच किनारी भागातील नागरिकांचे सुरक्षितस्थळी हलविण्यात आले आहे.

### शासन आपल्या दारी अभियान!

# राज्यात ३५ लाख जणांना लाभ

## मुख्यमंत्र्यांची माहिती; युती सरकारच्या एकोप्याचे पालघरमध्ये दर्शन

**पालघर : प्रतिनिधी**

शासन आपल्या दारी अभियानांतर्गत राज्यात ३५ लाख लाभार्थ्यांपर्यंत विविध योजना पोहचविल्या आहेत. सामान्य माणसापर्यंत जोपर्यंत योजना पोहचणार नाही, तोपर्यंत सरकार काम करीत राहिल. या सरकारने सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, तरुण वर्ग यांना केंद्रबिंदू मानून हे शासन काम करीत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी (दि. १५) केले. 'शासन आपल्या दारी'चा पालघर जिल्हा कार्यक्रमाचा शुभारंभ कोळगाव येथे आयोजित करण्यात आला होता. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते.

या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, पालकमंत्री रवींद्र चव्हाण, खासदार राजेंद्र गावित, सर्वश्री आमदार हितेंद्र ठाकूर, श्रीनिवास वनगा, क्षितीज ठाकूर, विवेक पंडित, निरंजन डावखरे, रवींद्र फाटक, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, पालघरच्या नगराध्यक्ष उज्वला काळे, डहाणूचे नगराध्यक्ष भरत राजपूत, विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी गोविंद बोडके, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्यासह अधिकारी आणि लाभार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने



भाजप-शिवसेना युतीच्या एकोप्याचे पुन्हा एकदा दर्शन झाले.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मागील ११ महिन्यांमध्ये परदेशी थेट गुंतवणकीत महाराष्ट्र अग्रेसर आहे. प्रथमच मागच्या मंत्रिमंडळ बैठकीत सततच्या पावसामुळे होणाऱ्या नुकसानीपोटी १५०० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला. पंचामृत अर्थसंकल्पामध्ये सर्व समावेशक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे.

सर्वसामान्यांसाठी काम करणारे हे सरकार सामान्यांच्या जिवनात गुणात्मक बदलासाठी काम करीत आहे. जोपर्यंत योजनांचा लाभ तळागळातील जनतेपर्यंत पोहचणार नाही तोपर्यंत ही सर्व यंत्रणा कार्यरत राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी म्हणाले.

केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांनी सांगितले की, पालघर जिल्ह्याच्या दृष्टिकोनातून शासन आपल्या दारी या योजनेचा शुभारंभ होणे म्हणजे सुवर्णाक्षरांनी नोंद घेण्यासारखे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पनेतून देशात अनेक योजनांचा लाभ डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येत आहे. राज्याच्या विकासासाठी विविध योजना मैलाचा दगड ठरत आहेत.

पालकमंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री हे सामान्य जनतेच्या कल्याणासाठी काम करीत आहेत. यात जतनेदेखील सहकार्य करणे गरजेचे आहे.

या वेळी पालघर जिल्ह्यासाठी रुग्णालयाचे भूमिपूजन व जलजीवन मिशनचे ई-भूमिपूजन करण्यात आले.

**माझी आणि देवेंद्र फडणवीसांची दोस्ती आताची नाही. ते आमदार आणि मी आमदार होतो तेव्हापासून आमची मैत्री होती. हा फेव्हिकॉलचा जोड आहे. कितीही प्रयत्न केले तरी दोस्ती तुटणार नाही. ही जोडी युतीची आहे. काही लोक स्वार्थासाठी एकत्र आले होते त्यांना जनतेने दूर केले. आताचे सरकार सर्वसामान्यांचे असून जनतेच्या दारापर्यंत पोहचतंय.**
**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**एखाद्या जाहिरातीमुळे किंवा कुणाच्या वक्तव्यामुळे या सरकारमध्ये कुठे काही होईल इतके तकलादू हे सरकार नाही. हे जुने सरकार नाही. जुन्या सरकारमध्ये कुणी आधी भाषण करायचे आणि कुणी नंतर भाषण करायचे यावरून गच्ची पकडणारे आम्ही पाहिले, मात्र आमचे सरकार सामान्यांसाठी काम करणारे सरकार आहे.**
**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**

# शाळा प्रवेशोत्सव जल्लोषात

### पनवेलमध्ये विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत | आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : प्रतिनिधी**

उन्हाळ्याची सुटी संपल्यानंतर गुरुवार (दि. १५)पासून शाळा पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. पनवेल महापालिकेच्या १० शाळांमध्ये पहिल्या दिवशी पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन व औक्षण करून ढोल ताशाच्या गजरात स्वागत करण्यात आले. या वेळी धाकटा खांदा येथील शाळेत आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली.



शाळेच्या पहिल्या दिवशी महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची लेझिम, ढोल ताशाच्या गजरात रॅली काढण्यात आली होती. लोकनेते दि. बा. पाटील शाळेत शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी किर्ती महाजन यांनी पाठ्यपुस्तक, पुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले तसेच इतर नऊ शाळांमध्ये मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. सर्व विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी खास सेल्फी पॉंईट तयार करण्यात आला होता. तेथे विद्यार्थी, पालकांनी फोटो काढले.

धाकटा खांदा येथील शाळेत आमदार प्रशांत ठाकूर व माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांनी सदिच्छा भेट दिली. मुख्याध्यापक सुमन हिलम यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शाळेची पटसंख्या, पुस्तक वाटप या विषयी माहिती घेतली.

### मनपा इंग्लिश मीडियम स्कूलचा केजी वर्ग सुरु

या वर्षी लोकनेते दि. बा. पाटील शाळेत महापालिकेच्या इंग्लिश मीडियम स्कूलचा सिनिअर केजीचा वर्ग सुरू करण्यात आला. या शाळेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. या विद्यार्थ्यांचेही औक्षण करून गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले.

## राऊतांच्या सुरक्षेसाठी धमकीचा बनाव

### सूत्रधाराला अटक

**मुंबई : प्रतिनिधी**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि त्यांचे बंधू आमदार सुनील राऊत यांना काही दिवसांपूर्वी धमकीचे फोन आले होते. याबाबत पोलिसांनी तपास करून मयूर शिंदे नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. शिंदे हा राऊतांचाच निकटवर्तीय असल्याचे पोलीस तपासात समोर आले असून राऊतांची सुरक्षा वाढावी यासाठी हा बनाव रचल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी चार जणांना पोलिसांनी यापूर्वीच अटक केली आहे.

खासदार संजय राऊतांची सुरक्षा वाढावी यासाठी मयूर शिंदेने स्वतः धमकीचा फोन केला नव्हता, तर इतर साथीदारांना फोन करायला सांगितले. मयूर हा या प्रकरणाचा मुख्य आरोपी असून अधिक तपास सुरू आहे.

## मुंबई लोकलमध्ये तरुणीवर जबरदस्ती

**मुंबई : प्रतिनिधी**

**आरोपी अटकेत**

मुंबई लोकल ट्रेनमधून परीक्षेला जात असलेल्या तरुणीवर जबरदस्ती केल्याची घटना बुधवारी (दि. १४) सकाळी घडली. घटनेनंतर आरोपीला अवघ्या आठ तासांत अटक करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. नवाज करीम (वय ४०) असे आरोपीचे नाव आहे. **(पान २ वर..)**



## पनवेलमधील न्हावे येथे विकासकामांचा शुभारंभ

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपच्या माध्यमातून रायगड जिल्ह्याचा विकास वेगाने होत आहे. यालाच अनुसरून पनवेल तालुक्यातील न्हावे गावात भाजपच्या पाठपुराव्यामुळे सुमारे २३ लाख रुपयांची विकासकामे होणार आहेत. या कामांचे भूमिपूजन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १५) झाले.

भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे पनवेल आणि उरण तालुक्यात होत आहेत. याच अनुषंगाने भाजपच्या पाठपुराव्यामुळे सिडकोच्या अनुदानातून न्हावे येथे नऊ लाख २१ हजार ३१६ रुपये खर्चून अंतर्गत गटारे व गावचा मुख्य रस्ता दुरुस्ती आणि पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम नऊ लाख ३३ हजार ४३८ रुपये खर्चून करण्यात येणार आहे तसेच न्हावे ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पालखी परिक्रमेमागे पेवर ब्लॉक बसवण्याचे काम चार लाख ९९ हजार ६४ रुपये खर्चून करण्यात येणार आहे. या तीनही विकासकामांचे भूमिपूजन भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.

या विकासकामांच्या भूमिपूजन समारंभास ग्रामपंचायत सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच प्रल्हाद पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रवींद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, देवेंद्र भोईर, अमृता पाटील, निर्मला ठाकूर, कल्पना घरत, विजया ठाकूर, कार्यकर्ते शैलेश पाटील, दीपक भोईर, किशोर घरत, जय घरत, रवी पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

**पनवेल : शहरातील रोहिदास वाडा येथे महापालिकेच्या वतीने बांधण्यात येणाऱ्या समाजमंदिराचे काम पूर्णत्वास येत आहे. त्या अनुषंगाने माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या समाजमंदिराची तसेच मान्सूनच्या पार्श्वभूमीवर तेथील गटारांच्या कामाची गुरुवारी पाहणी केली व आढावा घेतला. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, भाजप प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, प्रवीण मोहोकर, रजनीश जाधव, बाबू कल्याणकर, उमेश भोसकर, बाब्या जाधव, सचिन उरणकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**



## निवडक

### पुणे 'आकाशवाणी'वरील बातमीपत्र सुरूच राहणार

**मुंबई** : आकाशवाणी पुणे केंद्रातील वृत्त विभाग बंद करण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्तक्षेपानंतर प्रसारभारतीने मागे घेतला असून या केंद्रावरूनच यापुढे बातमीपत्रे प्रसारित होणार असल्याचे आदेश प्रसारभारतीने गुरुवारी (दि. १५) जारी केले. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांचे आभार मानले आहेत.

### राज्यसेवा मुख्य परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी जाहीर

**नवी दिल्ली** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२१चा निकाल जाहीर झाला असून आयोगातर्फे गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. गुणवत्ता यादी व शिफारस यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## वरुणराजाच्या सलामीनंतर बळीराजाची लगबग

**माणगाव : प्रतिनिधी**

लांबलेल्या पावसाने अखेर रिमझिम सुरुवात केल्याने बळीराजा शेतीकामात व्यस्त झाला असून पेरणीच्या कामांना वेग आला आहे.

सर्वसाधारणपणे ७ जूनच्या आसपास हजेरी लावणाऱ्या पावसाचे यंदा त्यानंतर आठ दिवस उलटून गेल्यानंतरही आगमन न झाल्याने शेतकरी पावसाची चातकासारखी आतुरतेने वाट पाहत होते. पाऊस लांबत चालल्याने पेरणीची कामे खोळंबली होती. अखेर मंगळवारपासून रिमझिम पावसाने सुरुवात केल्याने शेतकऱ्यांनी पेरणीच्या कामांना गती दिली आहे.

विविध प्रकारचे बियाणे खरेदी केल्यावर पारंपरिक पद्धतीने शेती नांगरून पेरणी केली जाते. हल्ली भाताबरोबरच नाचणी, वरीची पेरणी तसेच कणके, हळद इत्यादींचे वाफे व अन्य भाजीपाला लागवड केली जात आहे. पाऊस सक्रिय झाल्यास पेरणीची रूजवणूक चांगली होऊन लावणीची कामे वेळेत होतील, असा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

**यंदा पाऊस लांबल्याने शेतीची कामे खोळंबली होती. पाऊस कधी पडतोय याची वाट पहात होतो. अखेर मंगळवारपासून रिमझिम पाऊस सुरू झाल्याने पेरणीला सुरुवात केली आहे. असाच पाऊस पडत राहिल्यास लावणीची कामे वेळेत पूर्ण होतील.**
**-ज्ञानेश्वर खिडबिडे, शेतकरी, माणगाव**



(छाया : सलीम शेख)

## ज्येष्ठ पत्रकार डॉ. सचिन पाटील यांचे निधन

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील ज्येष्ठ पत्रकार व दैनिक रामप्रहरचे माजी संपादक डॉ. सचिन पाटील यांचे गुरुवारी (दि. १५) हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

डॉ. सचिन पाटील यांनी आपल्या पत्रकारितेची सुरुवात दै. महानगरमधून केली. दै. कोकण टूडे, दै. कुलाबा दर्पण, दै. रामप्रहरचे संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले. त्याचप्रमाणे दै. सकाळच्या आवृत्ती प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली. दै. लोकमत, दै. महानगर, दै. जनशक्तिमध्येही उपसंपादक म्हणून काम पाहिले.



डॉ. सचिन पाटील यांची अभ्यासू पत्रकार म्हणून ओळख होती. त्यांनी पीएचडी केली होती. त्याचबरोबर एलएलबी पदवीदेखील मिळविली. सध्या ते वकील म्हणून कायद्याच्या क्षेत्रातही कार्यरत होते. अशा या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे. दै. रामप्रहर परिवार त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहे.

डॉ. सचिन पाटील यांच्या पार्थिवावर अलिबाग येथील श्रीबाग वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी त्यांचे अंतिम दर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

# एसटीच्या विकासासाठी सदैव पाठिशी

## वर्धापन दिन सोहळ्यात मुख्यमंत्र्यांचे आश्वासन

**मुंबई : प्रतिनिधी**

तोट्यातील एसटी महामंडळाने आता स्वावलंबी झाले पाहिजे. एसटी महामंडळ कुठे कमी पडत असेल तर मी एसटीच्या पाठीशी उभा आहे, मात्र एसटी महामंडळाने स्वत:च्या पायावर उभे राहणे गरजेचे आहे. कुठे निधीची कमतरता भासली तर मागून घ्या. मी अर्थमंत्र्यांशी बोलून निधीची तरतूद करेन. एसटीने सार्वजनिक खासगी भागीदारी (पीपीपी) मॉडेल राबवून विकासाच्या दिशेने पावले टाकली पाहिजेत. एसटीच्या जमिनीचे मूल्यवर्धन करून त्यावर महामंडळाने उत्पन्नाचे स्रोत निर्माण करावेत, असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसटीच्या अमृतमहोत्सवी वर्धापन दिन सोहळ्यात केले.

एसटीचा अमृतमहोत्सवी वर्धापन दिन सोहळा बुधवारी नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात झाला. या वेळी आमदार भरत गोगावले, एसटीचे सदिच्छादूत तथा अभिनेते मकरंद अनासपुरे, परिवहन व बंदरे विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, एसटीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्ष आणि एसटीचे अमृत महोत्सवी वर्ष हा



दुग्धशर्करा योग आहे. एसटी महामंडळाने ‘बहुजन हिताय, बहुजन सुखाय’ या ब्रीद वाक्याप्रमाणे काम केले आहे. राज्य सरकारने जाहीर केलेल्या ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास आणि महिलांना ५० टक्के प्रवास सवलत अशा योजनांमुळे एसटीच्या प्रवासी संख्येत वाढ झाली आहे.

सध्या १६ हजार बस एसटीच्या ताफ्यात आहेत. लवकरच सात हजार बस येतील. यासह बसस्थानकांवर जमीन उपलब्धतेनुसार मराठी चित्रपटांसाठी ‘मिनी थिएटर’ ही नवीन संकल्पना राबवण्यात येईल. शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता देण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. धर्मवीर आनंद दिघे मोफत आरोग्य तपासणी योजना: एसटीचे कर्मचारी विशेषत: चालक, वाहक यांची दैनंदिन कामाची धावपळ असते. त्यांना जवळपास १० प्रकारच्या आरोग्य तपासण्या एसटी महामंडळाच्या माध्यमातून मोफत करून देण्यात येणार आहेत. या योजनेसाठी धर्मवीर आनंद दिघे मोफत आरोग्य तपासणी योजना असे नावही कार्यक्रमावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी जाहीर केले.

### कर्मचारी पाल्यांसाठी परदेशी शिक्षण अग्रीम योजना

**एसटीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची मुले जर परदेशात शिक्षणासाठी जाऊ इच्छित असतील, तर केवळ आर्थिक अडचणीमुळे त्यांची परदेशी शिक्षण घेण्याची संधी नाकारली जाऊ नये. यासाठी एसटी महामंडळातर्फे त्यांना बिनव्याजी १० लाख रुपये अग्रीम देण्यात येणार आहे.**

# मोबाईलसह दुचाकी चोरणारा चोरटा गजाआड



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड आणि पुणे जिल्ह्यात दुचाकी तसेच मोबाईल चोरणाऱ्या अट्टल चोरट्यास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाने जेरबंद केले आहे. त्याच्याकडून एक लाख ६० हजार किंमतीच्या पाच दुचाकी तसेच मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

मयुरेश अनंत डेरे (वय ३३, रा. २४० कसबापेठ, पुणे–११, मूळ रा. भुनेश्वर, रोहा) असे या चोरट्याचे नाव आहे. अलिबाग पोलीस ठाण्यातील गुन्ह्याच्या समांतर तपासादरम्यान स्थानिक गुन्हे अन्वेषन विभागाचे पोलीस उपनिरीक्षक धनाजी साठे यांना गोपनीय बातमीदाररमार्फत मयुरेश डेरेबाबत माहिती मिळाली. मूळचा रोहा तालुक्यातील राहणारा हा आरोपी सध्या पुणे येथे तात्पुरत्या स्वरूपात राहण्यास गेला आहे. अधून मधून तो रायगड जिल्ह्यात आल्यावर मोटर सायकल तसेच मोबाईल चोरी करीत असतो अशी माहिती मिळाली.

संशयित व्यक्तीस पोलीस हवालदार विकास खैरनार, जितेंद्र चव्हाण, हनुमंत सुर्यवंशी, शिपाई अक्षय सावंत यांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडे दाखल गुन्ह्याबाबत चौकशी केली असता, त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. अलिबाग, रोहा, विश्रामबाग पोजीस स्टेशन पुणे, चंदननगर पुणे येथे विविधी गुन्हे उघडकीस आले आहेत.

# कल्याणकेंद्राच्या उभारणीसाठी भरीव सहकार्य करावे -ग.दि.कुलथे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

अधिकाऱ्यांच्या विविध प्रश्नांसाठी राजपत्रित अधिकारी महासंघ सातत्याने अग्रसर राहिला आहे. कल्याणकेंद्राच्या उभारणीसाठी कोकण भवनातील राजपत्रित अधिकाऱ्यांनी भरीव सहकार्य करावे असे प्रतिपादन राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक व सल्लागार ग. दि. कुलथे यांनी केले. कोकण भवनमधील राजपत्रित अधिकारी महासंघ समन्वय समितीची बैठक गुरुवारी (दि. १५) कोकणभवन येथे झाली. या वेळी ते बोलत होते.

राजपत्रित महासंघाचे अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, कल्याणकेंद्र समन्वयक सुदाम टाव्हरे, राजपत्रित महासंघाचे राज्याचे उपाध्यक्ष गणेश देशमुख, राजपत्रित अधिकारी महासंघ, कोकण भवन समन्वय समितीचे अध्यक्ष तथा उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे, मकरंद देशमुख उपायुक्त (महसूल), जि. ल. भोपळे, सहसंचालक, नगररचना, उपायुक्त (विक्रीकर) कमलेश नागरे, सहसंचालक (विक्रीकर) जयंत



पाटील तसेच इतर विभागातील अधिकारी उपस्थित होते.

या वेळी राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण भवन समन्वय समितीच्या वतीने एक लाखांचा धनादेश कुलथे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला.

कुलथे म्हणाले की, जुनी पेन्शनसंदर्भात या महिना अखेर शासनाकडून अहवाल येणार आहे. यासंदर्भात शासनाकडून असमाधानकारक अहवाल आला तर अधिकाऱ्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे. जुन्या पेन्शनधारकांनी नवीन पेन्शनधारकांना सहकार्य करावे. कल्याण केंद्राच्या उभारणीसाठी शासनाने १० कोटी रुपये दिले आहेत. कल्याण केंद्राच्या उभारणीसाठी अंदाजे ६० कोटी खर्च होणार आहे. सर्व राजपत्रित अधिकारी गट–अ यांनी प्रत्येकी ११ हजार रुपये व ब गटातील अधिकाऱ्यांनी प्रत्येकी पाच हजार रुपये वर्गणी जमा करावी, तसेच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एक दिवसाचा पगार शासनास जमा करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गणेश धुमाळ, विनोद देसाई यांनी महासंघाच्या कार्याचा अहवाल सादर केला, तसेच सूत्रसंचालन अश्विनी चौधरी यांनी केले.

# एसटी बसची स्कूटरला धडक

## एक ठार, एक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

भरधाव एसटी बसची एका स्कूटरला धडक बसून झालेल्या अपघातात स्कूटरवर बसलेल्या एकाचा मृत्यू झाला आहे, तर दुसरा गंभीर जखमी झाल्याची घटना पनवेलजवळील तारा गावाच्या हद्दीत असलेल्या ओव्हरब्रिजवर घडली आहे.

पनवेलकडून पेण बाजूकडे स्कूटरवरून फिर्यादी भुवन भट (वय २६) व त्यांचे सहकारी श्रीकांत पवार (वय ३०) हे पनवेलजवळील तारा गावाच्या हद्दीत असलेल्या ओव्हरब्रिजवरून चालले असताना समोरून आलेल्या भरधाव एसटी बसने त्यांच्या स्कूटीला धडक दिली. या धडकेत श्रीकांत पवार यांचा गंभीररीत्या जखमी होऊन मृत्यू झाला आहे, तर भुवन भट हा गंभीररित्या जखमी झाला आहे. या घटनेची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल **श्री. अविनाश अरूण केणी,** यांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे मालकांबरोबर बोलणी करून सदर मिळकत खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे ऊसर्ली बुद्रुक, ता. पनवेल, जि. रायगड**

| भोगवटादाराचे नाव | गट/ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र. हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) श्री. गोटीराम म्हात्रे<br>२) श्री. रूपेश म्हात्रे आणि<br>३) श्री. निलेश म्हात्रे | ६३ | ४ | ०–२५–०० | २.४४ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीवर मालक / भोगवटादार अशी नावे असलेल्या व्यक्ती म्हणजेच **१) श्री. गोटीराम म्हात्रे, २) श्री. रूपेश म्हात्रे आणि ३) श्री. निलेश म्हात्रे** यांच्या नावाची नोंद आहे. तरी सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीशी कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, वारसाहक्क, वहिवाट, साठेकरार, खरेदीखत, पोटगी, एम. ओ.यू. अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्या व्यक्तीने वर नमूद केलेल्या हक्काबाबत त्यांच्याजवळ असलेल्या योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसापर्यंत खालील पत्यावर लेखी हरकत घ्यावयाची आहे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत नोंदविली नाही तर, वर नमुद केलेला व्यवहार पुर्ण केला जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- १६/०६/२०२३** **सही/-**

**ॲड. अतिश सुनिल परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
**मोबा. नं. ९७०२८९८९८९**
**गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स,**
**श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड**


# छत्री आणि रेनकोट खरेदीसाठी नागरिकांची लगबग

**पनवेल : वार्ताहर**

पावसाने अद्याप दमदार सुरुवात केली नसली तरी छत्री आणि रेनकोटची खरेदी करण्यासाठी नागरिकांची पावले बाजारपेठांकडे वळू लागली आहेत.

चिनी छत्र्यांवर बंदी, भारतीय छत्र्यांच्या मागणीत होत असलेली वाढ आणि बाजारातील उपलब्ध छत्री, रेनकोट आदी विविध कारणांमुळे किमतीवर परिणाम झाला आहे. यामुळे गतवर्षीच्या तुलनेत यंदा छत्री, रेनकोटच्या किमतीत १० ते १२ टक्क्यांनी वाढ झाली असून ग्राहकांना छत्री, रेनकोटसाठी अधिक पैसे मोजावे लागत आहेत.

गतवर्षी नियमितपणे शाळा, महाविद्यालये, कार्यालये सुरू झाली. यामुळे गतवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी छत्री, रेनकोटचा मोठ्या प्रमाणावर खप झाला होता. यंदाही छत्री आणि रेनकोटला मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. सध्या बाजारात छत्रींची दर्जानुसार किंमत १५० ते एक हजार रुपयापर्यंत, तर रेनकोट २०० ते एक हजार ५०० रूपयांपर्यंत आहे, तसेच लहान मुलांना आकर्षित करणाऱ्या रंगीबेरंगी छत्र्याही बाजारात उपलब्ध आहेत. या छत्र्यांच्या किमती ३०० रुपयांपासून ६०० रुपयांपर्यंत आहे. प्रसिद्ध कंपनीच्या छत्रीची किंमत ५५० रुपयांपासून दोन हजार रुपयांपर्यंत आहेत. लहान मुलांचे रेनकोट ४०० रुपयांपासून ८०० रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत.



# ज्ञानोबा-तुकोबा महाकरंडक स्पर्धेत कोल्हापूर कारागृह प्रथम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र कारागृह विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बंदीजनांसाठी घेण्यात आलेल्या पहिल्या राज्यस्तरीय जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज भजन आणि अभंग स्पर्धेत कोल्हापूर कारागृहाने प्रथम क्रमांक पटकाविला. संघाला ज्ञानोबा–तुकोबा महाकरंडक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेत येरवडा, पुणे कारागृहाचा संघ द्वितीय, तर नाशिक कारागृहाचा संघ तृतीय आला. या संघांना अनुक्रमे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज महाकरंडक आणि प्रमाणपत्र, संत शेख महंमद महाकरंडक आणि प्रमाणपत्र देण्यात देण्यात आले.



स्पर्धेची महाअंतिम फेरी मंगळवारी (दि.१३) कारागृह कर्मचारी भवन, येरवडा कारागृह येथे घेण्यात आली. नाशिक, नागपूर, कोल्हापूर, तळोजा, पुणे आणि अमरावती या संघात अंतिम फेरी झाली. पारितोषिक वितरण गृह विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे (अपिल व सुरक्षा) यांच्या हस्ते झाले. शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठानचे अध्यक्ष व स्पर्धा प्रमुख लक्ष्मीकांत खाबिया यांच्यासह उद्योजक विठ्ठल मणियार, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर, कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई, कारागृह उपमहानिरीक्षक स्वाती साठे, नंदकुमार बंड यांची प्रमुख उपस्थिती होती. तळोजा, अमरावती व नागपूर या संघांना उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. स्पर्धेचे परीक्षण संगीततज्ज्ञ प्रमोद रानडे, डॉ. राजेंद्र दूरकर आणि युवा गायिका सावनी सावरकर यांनी केले.


## जाहीरनामा

**एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल (ग्रामीण)**
**जिल्हा परिषद, रायगड–अलिबाग**
**मिनी अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस पदभरती २०२३**

जाहीरात क्र. १/२०२३ दिनांक : १६/०६/२०२३

महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय १) शासन निर्णय क्र . एबावि – २०२२/ प्र.क्र. ९४/का.६ दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२३. २) महिला व बाल विकास विभाग शासन नि. क्र. PIL – २०१८ / प्र. क्र. २२३/का.६ दि.०९ जानेवारी, २०२३. ३) मा. आयुक्त, एबाविसेयो यांचे पत्र जा. क्र. एबाविसेयो/अंगणवाडी/का–७/५११/२०२३ दि. ०७/०२/२०२३. ४) मा. आयुक्त, एबाविसेयो यांचे दिनांक २७/०४/२०२३. ५) महिला व बाल विकास विभाग, शा.नि. क्र. एबावि–२०१७/प्र.क्र. २७९/का.६/दि. ३०.११.२०१८ उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग यांचे दि. ०८/०६/२०२३ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पनवेल अंतर्गत **मिनी अंगणवाडी सेविका २ (दोन) पदे अंगणवाडी मदतनीस ३९ (एकोणचाळीस) पदे असे एकूण ४१ पदे** भरावयाचे आहेत. त्याकरीता ज्या गावात अंगणवाडी आहे अशा **महसूल गावातील (ज्यात वाडी/वस्ती/पाडे यांचा समावेश असेल)** ग्रामपंचायत नव्हे स्थानिक महिला उमेदवारांकडून जाहिराती मधील नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन पद्धतीने कार्यालयीन वेळेत दिनांक १९/०६/२०२३ ते ०३/०७/२०२३ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत अर्ज स्विकारले जातील. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास पात्र महिला उमेदवाराचे वय **किमान १८ वर्ष ते कमाल ३५ वर्षे** इतके असून, **विधवा महिलांसाठी ही वयोमर्यादा कमाल ४० वर्षे** अशी राहील. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**अंगणवाडी निहाय भरावयाच्या पदांचा तपशिल**

**मिनी अंगणवाडी सेविका :- एकूण पदे -२ ( प्रत्येकी १ पद)**

| अ.क्र. | अंगणवाडी नाव | अ.क्र. | अंगणवाडी नाव |
|---|---|---|---|
| १ | वाजापूर | २ | निताळेमानपाडा |

**अंगणवाडी मदतनीस :- एकूण पदे – ३९ (प्रत्येकी १ पद)**

| अ.क्र. | अंगणवाडी नाव | अ.क्र. | अंगणवाडी नाव | अ.क्र. | अंगणवाडी नाव | अ.क्र. | अंगणवाडी नाव | अ.क्र | अंगणवाडी नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भंगारपाडा | ९ | तुराडे–२ | १७ | पेठ मोहोल्ला | २५ | पळस्पे–३ | ३३ | रिटघर |
| २ | माणघर | १० | सावळा–१ | १८ | कोळखा–१ | २६ | भाताण | ३४ | दुद्रेपाडा |
| ३ | चिंचपाडा–२ | ११ | सोमटणे | १९ | मोहो | २७ | सांगूर्ली | ३५ | केवाळे–१ |
| ४ | कराडे खु. | १२ | बामणडोंगरी–१ | २० | पोयंजे–२ | २८ | नांदगाव–१ | ३६ | आदई–१ |
| ५ | दापिवली–२ | १३ | बामणडोंगरी–२ | २१ | बारवई | २९ | तुरमाळे | ३७ | नेरे–३ |
| ६ | दापिवली–४ | १४ | जावळे | २२ | वडघर–१ | ३० | कळखंड | ३८ | वाजे–१ |
| ७ | दहिवली | १५ | कोपर–२ | २३ | वडघर–२ | ३१ | साई–२ | ३९ | खैरणे– १ |
| ८ | देवळोली | १६ | बेलपाडा–१ | २४ | पळस्पे–१ | ३२ | दिघाटी | | |

**टिप :-** अर्जाचा नमुना व अटी/शर्ती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. प्रत ग्रामपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध असून, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल ग्रामीण कार्यालयात देखील उपलब्ध आहेत. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या पत्त्यावर संपर्क साधावा.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :-** बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, प्रकल्प पनवेल ग्रामीण, पंचायत समिती पनवेलच्या आवारात, डि.एड्. कॉलेजच्या बाजूला, ओल्ड पनवेल. जि. रायगड.

**सही/-**
**चेतन प्रकाश गायकवाड**
**बाल विकास प्रकल्प अधिकारी**
**एकात्मिक बाल विकास सेवा योजना,**
**प्रकल्प पनवेल (ग्रामीण)**


पान १ वरून

## मुंबई लोकलमध्ये तरुणीवर जबरदस्ती

मुंबईतील गिरगाव येथील रहिवासी असलेली तरुणी नवी मुंबईतील बेलापूर येथे एका परीक्षेला जात होती. ती सीएसएमटी–पनवेल लोकल ट्रेनच्या सेकंड क्लास डब्यातून प्रवास करीत होती. ट्रेन सुरू होताच आरोपी डब्यात चढला. पीडिता एकटीच असल्याचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर जबरदस्ती केली. या वेळी तरुणीने स्वत:चा बचाव करण्याचा प्रयत्न केला. तिने आरडाओरडा सुरू केल्यानंतर आरोपीने मस्जिद बंदर स्थानकावर उतरून पळ काढला.

यानंतर तरुणीने रेल्वे सुरक्षा दलाकडे (आरपीएफ) जाऊन तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरपीएफ, जीआरपी, क्राईम ब्रान्च आणि मुंबई पोलिसांनी पथके तयार करून आरोपींचा शोध सुरू केला. पोलिसांनी मस्जिद बंदर स्थानकात बसवलेले सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासून त्या व्यक्तीची ओळख पटवली आणि घटनेच्या आठ तासांनंतर दुपारी चारच्या सुमारास आरोपीला अटक करण्यात आली. आरोपी नवाज करीम रोजंदारी करणारा आहे. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला असून कसून चौकशी सुरू आहे.

दरम्यान, भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी या तरुणीवर बलात्कार झालेला नाही, तर आरोपीने तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तिची बदनामी करू नका, असे म्हटले आहे.


## दुखवटा

### छगन पाटील



**उरण** : माजी आदर्श मुख्याध्यापक छगन ल. पाटील (गुरुजी) यांचे वयाच्या ७६व्या वर्षी मंगळवारी (दि. १३) निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची दोन मुले, दोन मुली, नातवंडे, सुना, नातसुना, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी २२ जून रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे होणार आहे, तर उत्तरकार्य विधी २५ जून रोजी राहत्या घरी सारडे येथे होणार आहे.

### शंकर खंडागळे



**चौक** : पंचक्रोशीतील प्रसिद्ध लोहार शंकर सिताराम खंडागळे यांचे वयाच्या ८६व्या वर्षी निधन झाले. शंकर सिताराम खंडागळे हे चौक परिसरात लोखंडाची अवजारे बनविण्यासाठी प्रसिद्ध होते. बैलगाडीची चाके बनविण्यात त्यांचा हातखंडा होता. शेतीच्या आधुनिक तंत्रज्ञानाचा त्यांना अभ्यास होता. त्यांच्या अंत्ययात्रेस अनेक शेतकरी, व्यापारी व ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांच्या पश्चात चार मुली, जावई, एक मुलगा, सून, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांचे धार्मिक विधी चौक येथे २३ जून रोजी होणार आहेत, असे परिवाराकडून सांगण्यात आले.

# शाळा पुन्हा विद्यार्थ्यांनी गजबजल्या; आनंददायी वातावरण

## गव्हाण विद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ करिता प्रवेशित नवागत विद्यार्थ्यांचे स्थानिक शाळा समिती व विद्यालयाच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले.

इयत्ता पाचवी ते आठवीच्या नवीन प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन त्यांचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. या वेळी स्थानिक स्कूल कमिटी सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी यांचे हस्ते सर्व चिमुकल्यांचा गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या सर्व शिक्षा अभियानांतर्गत इयत्ता पाचवी ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. ग्रंथपाल महेश म्हात्रे यांनी पाठ्यपुस्तक वितरणाचे नेटके व ऑटोपशीर नियोजन केले.

या वेळी विद्यालयाच्या ज्येष्ठ शिक्षिका व रयत शिक्षण संस्थेच्या नवनिर्वाचित मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना सुधीर ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. दुग्ध शर्करा योग म्हणजे त्यांचा ४८वा वाढदिवस असल्यामुळे अनंताशेठ ठाकूर आणि विश्वनाथ कोळी यांच्या हस्ते त्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ग्रंथपाल महेश म्हात्रे लेखनिक चंद्रकांत मढवी तसेच अन्य अध्यापक, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## फडके विद्यालयात विद्यार्थ्यांचे औक्षण

**पनवेल : प्रतिनिधी**

नवीन पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालय इंग्रजी माध्यममध्ये गुरुवारी शाळेच्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत ताशाच्या गजरात औक्षण करून करण्यात आले. २१ जून रोजी शाळा रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत असल्याने विद्यार्थी व शिक्षकांत मोठा उत्साह दिसत होता.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३चा पहिला दिवस रंगबिरंगी फुगे व पताकांची सजावट फलकावर लिहिलेला स्वागत पूर्ण संदेश प्रार्थना तसेच मुख्याध्यापकांचे प्रेरक मार्गदर्शन, शिक्षक-विद्यार्थी मोकळा संवाद व नवीन विद्यार्थ्यांची ओळख अशा उत्साहमय वातावरणात सुरू झाला. अशा प्रकारे विद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये चैतन्यमय वातावरण पाहायला मिळाले.

या प्रवेशोत्सवात विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा महाजन यांनी सांगितले की, २१ जून रोजी आपण शाळेच्या रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहोत याची घोषणा करून, विद्यार्थ्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देत, विविध स्पर्धांमध्ये तसेच उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रवृत्त केले. या कार्यक्रमात शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी सहभागी होते. पालकांनी या चैतन्यमय प्रवेशोत्सवाचे आणि ताशा व ढोल वाजवणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.





## लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना पुष्प

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. उन्हाळ्याच्या सुटीनंतर पुन्हा शाळेची घंटा वाजली, विद्यालयात किलबिल सुरू झाली. या विद्यार्थ्यांचा आज विद्यालयातील पहिला दिवस त्यांचे पुष्प देऊन मोठ्या उत्साहाने स्वागत करण्यात आले.

शाळा आणि विद्यार्थी यांचे नाते अतूट असते, याच नात्याच्या बंधात, त्यांचे व्यक्तिमत्व घडते, म्हणूनच विद्यालयात उत्साहाने आणि आनंदाने येतात. आज लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल कॉलेज व कामोठे येथे विद्यार्थ्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले, रयत शिक्षण संस्थेचे, संस्थापक आदरणीय कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून रयतचे रायगड विभागाचे इन्स्पेक्टर रोहिदास ठाकूर तसेच रायगड विभागाचे सहाय्यक इन्स्पेक्टर शहाजी फडतरे, बाळासाहेब कारंडे, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठेचे प्राचार्य, अविनाश कुलकर्णी आदी मान्यवरांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत केले गेले.

विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच या स्वागतास विद्यालयाच्या पर्यवेक्षिका, सारिका लांजुडकर, कुसुम प्रजापती, नेहा खन्ना व शिक्षकवृंद उपस्थित होते.



## उरणमध्ये सर्वच माध्यमांच्या शाळा सुरू

**उरण : प्रतिनिधी**

उरण शहरासह तालुक्यातील प्रार्थमिक, माध्यमिक,उच्च माध्यमिक व इंग्रजी माध्यमांच्या सर्वच शाळा उन्हाळ्याच्या दिड महिना सुटीनंतर गुरुवार(दि. १५)पासून निर्बंधमुक्त सुरू झाल्या आहेत. पहिल्याच दिवशी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी वार्षिक निकालानंतर यंदा प्रथमच आपआपले मित्र-मैत्रिणी नव्या वर्गात प्रवेश करतांना आनंद द्विगुणित करतांना दिसत होते.

रायगड जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थ्यांना आजच्या दिवशीच पाठ्य पुस्तके वाटप करण्यात येणार असल्याने त्यांच्या चेहऱ्यावरही एक वेगळा आनंद दिसत होता. यंदाच्या शैक्षणिक वर्षांपासूनपासून राज्यातील नवीन शालेय शैक्षणिक वर्ष सुरू झाले आहे. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यात आले असून एकाच पुस्तकामध्ये सर्व विषयांचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यात आला आहे. तसेच शेतीविषयक अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहेत.

## कोपर शाळेत मोफत पाठ्यपुस्तके वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील रा.जि.प. शाळा- कोपर (गव्हाण) शाळेत शाळा प्रवेशोत्सवा निमिता शाळेतील विद्यार्थ्यांना गुरुवारी (दि. १५) मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

पाठ्यपुस्तकांचे वाटप शाळेचे चेअरमन अनंताशेठ ठाकूर व गव्हाण उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी रतन म्हात्रे, समीर घरत व पालकवर्ग उपस्थित होता. तसेच या वेळी कोपर येथील अंगणवाडी सेविका आशाबाई ठाकूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.





**कळंबोली : शाळेच्या पहिल्या दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या रोडपाली येथील शाळेत भाजप पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप केले. या वेळी भाजप कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, सरचिटणीस दिलीप बिष्ट व शाळेचे शिक्षक उपस्थित होते.**

# कामोठ्यात विद्यार्थ्यांचा सन्मान

- हर्षवर्धन पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य
- आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप युवा मोर्चाचे कामोठे शहराध्यक्ष हर्षवर्धन नामदेव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भाजयुमो कामोठे आणि इन्स्टिट्युट ऑफ पॅरामेडिकल एज्युकेशनच्या वतीने दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



कामोठे सेक्टर ६ येथील सद्गुरू वामनराव पै सभागृहातील ज्ञानसाधना केंद्रात हा सन्मान आणि मार्गदर्शन कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात दहावी आणि बारावीतील २०० गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह आणि ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी त्यांच्या पालकांसह भारतीय जनता पक्ष आणि युवा मोर्चा ही सोबत आहे, अशी ग्वाही दिली. तसेच मान्यवरांनी विद्यार्थ्यांना दहावी आणि बारावीच्या परीक्षांनंतर पुढील काळात येणाऱ्या विविध संधींविषयी मार्गदर्शन केले तसेच दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे देऊन त्यांचा गुणगौरव केला. यासोबतच हर्षवर्धन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक राजेश पाटील, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख रामदास शेवाळे, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक अरुणकुमार भगत, विकास घरत, माजी नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष मयुरेश नेतकर, कामोठे सरचिटणीस सुशील शर्मा, भटके विमुक्त आघाडीच्या महिला जिल्हाध्यक्षा विद्या तामखडे, शरद जगताप, दामोदर बाजीराव चव्हाण, आयपीएमईचे संस्थापक अध्यक्ष सागर साबळे, उपाध्यक्षा दर्शना साबळे, अशोक मोटे, जिल्हा युवा मोर्चा उपाध्यक्ष अमर ठाकूर, जमीर शेख, एम्पोवरचे संस्थापक अध्यक्ष शहाजी भोसले, अप्पासाहेब पाटील, सचिन लावंड, मनीषा वनवे, सतीश देशमुख, गोरकनाथ पोळ, प्राध्यापिका सायली चव्हाण, सागर ठाकरे, नील्सन क्लासचे सुनील सर, सुनील पांडा आदी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी हर्षवर्धन पाटील हा कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे कौतुक केल तसेच त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# सरपंच माधुरी पाटील यांचा गावठाण विस्तारासाठी पाठपुरावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शासनाने ग्रामीण भागात राहणाऱ्या गरजू लोकांना निवाऱ्याची उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने गावठाण विस्तार योजनेला सुरूवात केली आहे. कसळखंड ग्रुप ग्रामपंचायत हद्दीत गावठाण विस्तार करण्यासाठी डिजिटल सर्वे करण्यात आला आहे. यासाठी सरपंच माधुरी पाटील यांनी पुढाकार घेतला आहे.



चार ते पाच दिवस हा सर्वे चालणार असून ग्रामपंचायत हद्दीत ६० ते ७० टक्के घरे ही गुरुचरण जागेत असून गावठाण समजून गरजेपुरती बांधली ही घरे आहेत. या घरांचे बांधकाम मोजून ही घरे नियमित करण्यासाठी फॉरेस्ट गुरू चरण गावठाण लगत बांधलेली घरे नियमित करण्याच्या दृष्टिकोनातून प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला आहे. त्यासाठी डिजिटल सर्वे सुरू केला असल्याचे सरपंच माधुरी पाटील यांनी सांगितले.

या सर्वेसाठी सरपंच माधुरी पाटील, माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, शिवकर ग्रामपंचायतचे माजी सरपंच अनिल ढवळे, गोविंद पाटील, तुळशीराम घरत, प्रगतशील शेतकरी कमलाकर घरत, पोलीस निरीक्षक पंढरीनाथ गाडे, ह. भ. प वामन पाटील, रामचंद्र जुनघरे, सुधाकर लाड, रमेश गाढे, दत्ता गायकर, तानाजी पाटील हरी नाईक, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पुरणपोळीला सोन्याचा वर्ख!

**उरण : बातमीदार**

नवीन पनवेलमध्ये पोळी भाजी केंद्र चालक नारायण कंकणवाडी यांनी चक्क सोन्याचा वर्ख लावून पुरणपोळी बनवली आहे. सोन्याचा वर्ख देऊन बनवलेल्या दोन पोळ्यापैकी एक मंदिरात आणि दूसरी त्यांच्या मित्राला भेट देण्यात आली.



नवीन पनवेल शहरातील नारायण कंकणवाडी यांच्या शिवा पोळी भाजी सेंटर मध्ये सोन्याची पुरणपोळी बनवली जाते. संपूर्ण रायगड जिल्ह्यात त्यांची पुरणपोळी प्रसिद्ध आहे. उज्जैनमध्ये गेल्यानंतर कंकणवाडी यांना सोन्याची कुल्फी दिसली होती. त्यानंतर त्यांना आपण सोन्याची पुरणपोळी बनवावी असे सुचले. त्यांनी रविवारी ही सोन्याचा वर्ख लावून पुरणपोळी बनवली. हा प्रयत्न त्यांचा यशस्वी झाला. सोन्याचा वर्ख दिलेल्या दोन पुरणपोळ्या त्यांनी बनवल्या. शिवा पोळी भाजी सेंटरमध्ये दररोज दोनशेहुन अधिक पुरणपोळया बनवल्या जातात. यातील दोन पोळ्यांना त्यांनी सोन्याचा वर्ख लावला. त्यातील एक पुरणपोळी पनवेल शहरातील शिवा विश्वनाथ महादेव पावन मंदिरात चरणी अर्पण करण्यात आली तर दुसरी पोळी त्यांचे मित्र डॉ. वाय. बी. सोनटक्के यांना दिली.

संपूर्ण महाराष्ट्रातील सोन्याचा वर्ख देऊन केलेली ही पहिली पुरण पोळी असेल, असे मत नारायण कंकणवाडी यांनी व्यक्त केले.

## गटार साफ करताना एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

गटारामध्ये उतरून गटार साफ करण्याचे काम करीत असतांना तोल जाऊन एक व्यक्ती पाण्यात पडला. या अपघातामध्ये त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. नितेश शिंदे असे या मयत व्यक्तीचे नाव आहे.

खान्देश्वर रेल्वे स्टेशनचे समोरील मैदानात पालाचे झोपडीत राहणारा नितेश शिंदे (वय ३५) हा गटारामध्ये उतरून गटार साफ करण्याचे काम करीत होता. अचानक त्याचा तोल जाऊन तो पाण्यात पडला. यामध्ये त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलिसांनी आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.

## वृद्ध महिलेची सोनसाखळी खेचली

**पनवेल : वार्ताहर**

एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याची साखळी खेचून स्कूटी गाडीवरून आलेले दोघे जण पसार झाल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर ७ परिसरात राहणाऱ्या कलावती मोर्या (वय ७१) ह्या पायी जात होत्या. याचवेळी स्कूटी गाडीवरून आलेल्या दोघांपैकी एका लुटारूने त्यांच्या गळ्यातील सोन्याची ६३ हजार रुपये किमतीचे चैन खेचून पसार झाले आहेत. या घटनेची नोंद खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : शहरातील टिळक रोड येथील मनन जिजाई या अयान एंटरप्रायझेस यांच्या प्रकल्पाचे भूमिपूजन भाजप रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक राजू सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, आर्किटेक कुणाल जगनाडे आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# बदलाचे नवे वारे

समान नागरी कायद्याच्या संहितेची विधि आयोगाने पडताळणी सुरू केली असून विविध धार्मिक तसेच सार्वजनिक संस्था-संघटनांकडून सूचना आणि अभिप्राय मागवले आहेत. खरे तर हा उपचार तीन वर्षांपूर्वीच पार पडलेला आहे आणि त्यासंबंधीचा अहवाल विधि आयोगाच्या दफ्तरी दाखल आहे. याचा अर्थ एवढाच की केंद्र सरकारने मनात आणले तर समान नागरी कायदा अस्तित्वात येऊ शकेलही. परंतु भारतासारख्या विशाल देशात अनेक पंथ-धर्मीय नांदत असतात, त्यांचा विचार पुन्हा एकवार जाणून घेऊनच कार्यवाही करण्यावर केंद्र सरकारचा भर आहे.

**कुठल्याही देशाचा कारभार करताना सत्तेवरील सरकारने मानवी मूल्यांच्या प्रती संपूर्ण निष्ठा ठेवूनच काम करणे अपेक्षित असते. संविधानाने हीच अपेक्षा व्यक्त केली आहे. अर्थात सर्वच सरकारे इतक्या उदात्त हेतूने कारभार करतात असे नव्हे. राजकीय तडजोड आणि स्वार्थाच्या व्यापारात संविधानाला अपेक्षित असलेली मूल्ये पायदळी तुडवली जातात. मोदी सरकारने मात्र संविधानाचे पावित्र्य अबाधित राखून नऊ वर्षे यशस्वी कारभार केला. भारतीय जनता पक्षाचा उगम जनसंघात आहे हे सर्वांनाच ठाऊक आहे. स्थापनेपासून दोन मुद्दे जनसंघाच्या कार्यक्रम पत्रिकेत ठळकपणे नमूद केले गेले होते. तत्कालीन राज्यकर्त्यांनी जम्मू-काश्मीरला ३७० कलमाचे अभय दिले होते. हे वादग्रस्त कलम रद्द करणे आणि देशात समान नागरी कायदा लागू करणे या त्यांच्या प्रमुख घोषणा होत्या. पुढे भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर हे दोन्ही मुद्दे राजकीय पटलावर प्रखरपणाने आणण्याचा प्रयत्न झाला. या दोन्ही मागण्या भाजपने आपल्या कार्यक्रम पत्रिकेत समाविष्ट केल्या, त्यात नंतर अयोध्येतील राममंदिराची भर पडली. आता राममंदिराचे विधिवत उद्घाटन लवकरच होईल आणि जम्मू-काश्मीरमधील ३७० कलम हटविले गेले आहे. समान नागरी कायद्याचा एकमेव मुद्दा आता उरला असून त्याच्या अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारने हालचाली सुरू केल्या असाव्यात असे दिसते. समान नागरी कायदा देशात लागू व्हावा अशी अपेक्षा घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्येच नमूद करण्यात आलेली आहे. तथापि आपल्या देशातील भिन्न वंश आणि धर्माच्या समाजांसाठी काही विशेष वैयक्तिक कायदे तयार करण्यात आले. हिंदू समाजासाठी हिंदू कोड बिल आणण्यात आले. तर मुस्लिम समाजासाठी विशेष वैयक्तिक कायदा अंमलात आला. महाराष्ट्राच्या शेजारील गोवा हे राज्य पोर्तुगीज राजवटीमधून उशीरा मुक्त झाले. तेथे आधीपासूनच गोवा नागरी कायदा अस्तित्वात आहे. विवाह, वारसा हक्क, विवाह विच्छेद आणि मालकी हक्क अशा अनेक बाबींमध्ये सर्व धर्मांना, पंथांना आणि वंशीयांना एकसमान कायदा लागू करणे म्हणजे समान नागरी कायद्याचे राज्य आणणे होय. भारतासारख्या विविधतेने नटलेल्या, अठरापगड जातीधर्मांच्या समाजांनी विणल्या गेलेल्या बहुपेडी देशात समान नागरी कायदा आणणे आव्हानात्मक आहे हे तर खरेच. आपले संविधान सर्वच धर्मीयांना त्यांच्या पद्धतीने जगण्याचा अधिकार देते. समान नागरी कायद्यामुळे या अधिकारावर म्हणजे धार्मिक स्वातंत्र्यावर गदा येईल असे विरोधकांचे म्हणणे आहे. इतकेच नव्हे तर निवडणुका तोंडावर आलेल्या असताना भाजप सरकारने समान नागरी कायद्याचा मुद्दा उकरून काढला, अशी टीका होऊ लागली आहे. तथापि आपल्या अजेंड्यावरील तिसरा मोठा कार्यक्रम मोदी सरकार पार पाडेल याची खात्री वाटते. पंतप्रधान मोदी म्हणतात त्याप्रमाणे देश खरोखर बदलू लागला आहे.**

# आदिवासींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी अनुसूचित जमातीच्या एकूण १० विद्यार्थ्यांना परदेशात एम.बी.ए., वैद्यकीय शिक्षण, बी.टेक (इंजिनिअरींग), कृषी, विज्ञान व इतर विषयांचे पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता यावे, यासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना आयुक्तालयस्तरावर राबविण्यात येत आहे....या योजनेबाबतचा माहितीपूर्ण आढावा या विशेष लेखात घेण्यात आला आहे.

**असे आहेत निकष**

उमेदवाराची निवड करताना भूमीहीन आदिवासी कुटूंबातील विद्यार्थी, दूर्गम भागातील विद्यार्थी तसेच आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असावा. विद्यार्थी हा अनुसूचित जमातीचा असावा. त्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांकडून जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र विद्यार्थ्याने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्याचे वय १ मे २०२२ रोजी जास्तीत जास्त ३५ वर्षापर्यत असावे. तथापि, नोकरी करीत असलेल्या विद्यार्थ्याचे बाबतीत उच्च वयोमर्यादा ही ४० वर्षापर्यंत राहील. परंतु नोकरीत नसलेल्या विद्यार्थ्यास निवडीच्या वेळी प्राधान्य देण्यात येईल. विद्यार्थ्यास परदेशातील मान्यताप्राप्त विद्यापीठात प्रथम वर्षाकरीता प्रवेश मिळालेला असावा. शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न कमाल मर्यादा जास्तीत जास्त रुपये सहा लाख रुपयांपर्यंत असावे.

विद्यार्थ्याने कोणत्या दिनांकास व कोणत्या विमानाने परदेशात जाणार आहे याची माहिती आयुक्तालयास दिल्याशिवाय त्याला परदेशात जाता येणार नाही. या शिष्यवृत्ती आदिवासी कुटुंबातील केवळ एकाच व्यक्तीस (मुलगा/मुलगी) आणि एकच अभ्यासक्रमास अनुज्ञेय राहील. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्याने निवडलेला अभ्यासक्रम अर्धवट सोडल्यास अभ्यासक्रमासाठी शासनामार्फत खर्च करण्यात आलेली संपूर्ण रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात येईल. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर भारतात परत येणे किंवा किमान पाच वर्ष भारतात सेवा करणे बंधनकारक राहील. या अटी मान्य असल्यासबंधी विद्यार्थ्याने लेखी हमीपत्र (बॉन्ड) दोन जामीनदारांसह सादर करावे लागेल. परदेशात अभ्यासक्रमासाठी एकदा निश्चित केलेला कालावधी वाढवता येणार नाही. अथवा शिष्यवृत्तीस मंजूरी घेतेवेळी जो अभ्यासक्रम निवडला आहे त्यात बदल करता येणार नाही. विद्यार्थ्याने निवडलेला अभ्यासक्रम व त्याचा कालावधी अर्जात स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम संपल्यावर संबंधित विद्यार्थ्यांने त्वरीत भारतात येऊन त्याचे अंतिम परिक्षेचे गुणपत्रक व प्रमाणपत्र आयुक्त, आदिवासी विकास यांना सादर करणे आवश्यक राहील. याशिवाय सध्या करीत असलेल्या व्यवसायाची माहिती द्यावी. नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी सादर करावयाचा अर्ज त्याच्या नियोक्त्यामार्फत सादर करणे बंधनकारक राहील. परदेशात ज्या विद्यापीठात विद्यार्थ्यास प्रवेश मिळाला आहे.




त्या विद्यापीठास आणि संस्थेस थेट ऑनलाईन प्रणालीनुसार खात्यावर ट्युशन फी जमा करण्यात येईल. तथापि विद्यार्थ्यासाठी निर्वाहभत्ता त्यांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यास, परदेशातील निवास हा अभ्यासक्रमाच्या कालावधीपलीकडे कोणत्याही परिस्थितीत वाढविता येणार नाही. संबंधित विद्यार्थ्याने अगोदरच्या वर्षाचे गुणपत्रक, विद्यापीठ शुल्क व निवास शुल्क अदा केल्याबाबत प्रमाणित प्रत दिल्यानंतरच पुढील वर्षाची शिष्यवृत्ती आयुक्त, आदिवासी विकास हे मंजूर करतील. परदेशातील ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची निवड झाली आहे त्या देशाचे पारपत्र (व्हिसा) प्राप्त करण्याची जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्याची राहील. यासाठी राज्य अथवा केंद्रशासनाचे कोणतेही अर्थसहाय्य उपलब्ध होणार नाही. ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थी प्रवेश घेणार आहे त्याच अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास शुल्क अनुज्ञेय राहील, इतर कोणताही अनुषगिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश व शुल्क अनुज्ञेय राहणार नाही.

परदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी GRE (Graduate Record Examination) तसेच TOFEL (Test of English as a Foreign Language)/ IELTS (International English Language Testing System) या प्रवेश परिक्षा घेतल्या जातात. सदर GRE च्या आधारावर प्रवेश घेणाऱ्या व TOFEL/ IELTS उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांचा विशेष विचार करण्यात येईल. ज्या परदेशी विद्यापीठाचे जागतिक रँकींग ३०० पर्यंत आहे अश विद्यापीठात प्रवेश मिळालेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र राहतील. मात्र निवड मेरीटनुसार होईल. विद्यार्थ्यास शिक्षण फी, परिक्षा फी, निर्वाह भत्ता (निवास व भोजन), शैक्षणिक कॉन्टेजन्सी चार्जेस हे लाभ देण्यात येतील. विमान प्रवास, व्हिसा फी, स्थानिक प्रवास भत्ता, विमा, संगणक, लॅपटॉप व आयपॅड व इतर सुविधांचा खर्च विद्यार्थ्याने स्वखर्चाने करावा लागेल. नोकरीत असलेल्या विद्यार्थ्यास या शिष्यवृत्तीसाठी सादर करावयाचा अर्ज त्याच्या नियोक्त्यामार्फत सादर करणे बंधनकारक राहील. परदेशात ज्या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्याची निवड झाली आहे, त्या देशाचे पारपत्र (व्हीजा) व पासपोर्ट मिळविण्याची जबाबदारी विद्यार्थ्याची राहील. यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध होणार नाही. परदेशातील विद्यापीठामध्ये प्रवेश मिळाल्याबाबतचे त्या विद्यापीठाचे पत्र व सबंधित विद्यापीठाच्या प्रॉस्पेक्टसची प्रत अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्कासह येणाऱ्या एकूण खर्चाचे संस्थेचे प्रमाणपत्र, परदेशातील ज्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला आहे, त्या अभ्यासक्रमाशी संबंधित असलेल्या शाखेतील / विभागातील दोन विद्येकनिष्ठ / फॅकल्टी यांचे शिफारसपत्र जोडावे. विद्यार्थ्याने शिक्षणानंतर नोकरी मिळाल्यावर शासनामार्फत खर्च करण्यात आलेल्या रक्कमेपैकी त्याच्या स्वेच्छेने १० टक्के रक्कम पाच वर्षामध्ये शासनामार्फत स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित जमातीसाठीच्या निधीमध्ये आदिवासी उपयोजना निधी जमा करणे अपेक्षित राहील.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे**

सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र, इयत्ता १२ वी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिकांच्या सत्यप्रती, कुटुंबातील व्यक्तींच्या वार्षिक उत्पन्नासंबंधी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र. अर्जदाराने परदेशात ज्या विद्यापीठात /मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रत्यक्ष प्रवेश मिळाला आहे. त्यासबंधित विद्यापीठाचे/ शिक्षण संस्थेचे पत्र (ऑफर लेटर) आणि त्या विद्यापिठाचे शैक्षणिक शुल्क आकारणीसंबंधी (ट्यूशन फी) व इतर खर्चाची (निवास व भोजन खर्च, बुक खर्च) तपशिलवार माहिती / विवरण. (प्रॉस्पेक्ट प्रतीसह), ज्या देशात उच्च शिक्षणासाठी जाणार आहे त्या देशाचे पारपत्र (पासपोर्ट ), दोन राजपत्रित अधिकाऱ्यांचे ओळख / शिफारस पत्र. विद्यार्थ्याचे वयासबंधी प्रमाणपत्र (शाळा सोडल्याचा दाखला/ इयत्ता १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्राची सत्यप्रत. अभ्यासक्रम पूर्ण न केल्यास/अर्धवट सोडल्यास, बनावट कागदपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास शासनाने केलेला पूर्ण खर्च परत करण्यात येईल याबाबत रु.१००/- चे स्टॅंप पेपरवर हमीपत्र. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळाल्यावर शासनाने खर्च केलेल्या रक्कमेपैकी स्वेच्छेने कमीत कमी १० टक्के रक्कम शासनामार्फत स्थापन करण्यात आलेल्या अनुसूचित निधीमध्ये (आदिवासी उपयोजना निधी) जमा करण्याबाबत रु.१००/-स्टॅंप पेपरवर शपथपत्र, परदेशी विद्यापीठामध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेण्यासाठी TOFEL/IELTS परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र. ज्या परदेशी विद्यापीठाचे जागतिक रँकींग ३००पर्यंत आहे त्या विद्यापिठाचे जागतिक रँकींगचे कागदपत्र सादर करण्यात यावीत.

शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळण्यासाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्र (अर्ज) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक, अपर आयुक्त, आदिवासी विकास नाशिक, ठाणे, अमरावती, नागपूर यांच्या कार्यालयात तसेच संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत विनामूल्य उपलब्ध आहेत.

शिष्यवृत्ती लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींनीवर नमूद कार्यालयातून विहित नमुन्यात शिष्यवृत्तीसाठी नमूना अर्ज प्राप्त करुन परिपूर्ण माहिती भरुन व त्यासोबत आवश्यक कागदपत्र प्रमाणित प्रतीसह अर्ज प्रकल्प अधिकारी एकात्मिक, आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यालयामार्फत अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्याकडे सादर करावेत.

**-मनोज शिवाजी सानप, जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग**



## बदलते तंत्रज्ञान

# यूट्यूब चॅनेल सुरू करा; होईल भरघोस कमाई!

तुम्ही देखील यूट्यूब कंटेंट क्रिएटर असाल आणि कमाईची चिंता करत असाल तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. आता तुम्हाला तुमच्या यूट्यूब चॅनेलच्या कमाईची काळजी करण्याची गरज नाही.




आता तुमच्या यूट्यूब चॅनलचे ५०० सब्स्क्राईबर्स असले तरीही कमाई केली जाऊ शकते. यासाठी कंपनीने नियमांमध्ये मोठा बदल केला आहे. यापूर्वी, चॅनलमधून कमाईसाठी किमान १००० सब्स्क्राईबर्सची आवश्यकता होती.

यूट्यूब ने म्हटलं आहे की, आम्ही यूट्यूब पार्टनर प्रोग्रामसाठी पात्रता निकषात कमी करत आहोत. आणि कमी सब्स्क्राईबर्स क्रिएटरसाठीही मोनेटायजेशन प्रक्रिया सुलभ करत आहे. कंपनी मोनेटायजेशन प्रोसेसची मर्यादा कमी करत आहे. म्हणजेच, आता कमी फॉलोअर्स असलेले क्रिएटर देखील त्यांच्या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून मोनेटायजेशन प्रक्रिया पूर्ण करून कमाई करू शकतील. यासाठी यूट्यूबने त्यांच्या नियमांत बदल केला आहे.

यूट्यूब ने व्हिडिओ पाहण्याचे तास ४००० ऐवजी आता ३००० वॉच आवर केले आहे. म्हणजेच आता वर्षभरात क्रिएटरला केवळ ३००० वॉच तास पूर्ण करायचे आहेत. यूट्यूब शॉर्ट्स व्ह्यूज १० मिलियनवरून तीन मिलियनपर्यंत कमी केले आहेत. क्रिएटरला चॅनेल मोनेटायजेशन करण्यासाठी ९० दिवसांत ३० लाख यूट्यूब शॉर्ट्स व्ह्यूज असणे आवश्यक आहे. हे नियम पहिल्यांदा अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, तैवान आणि दक्षिण कोरियामध्ये लागू केले जातील. यानंतर ते इतर देशांमध्येही लागू केले जाणार आहेत.

यूट्यूबच्या नवीन मोनेटायजेशन प्रक्रियेचा छोट्या आणि नवख्या यूट्यूब ला खूप फायदा होणार आहे. त्यांना आता यूट्यूब वर त्यांच्या कंटेटची कमाई करण्याच्या अधिक संधी असतील. पण त्यांचे प्रेक्षक वाढवण्यासाठी आणि जाहिरातींचा महसूल मिळविण्यासाठी त्यांना काही बेंचमार्क पूर्ण करणे आवश्यक आहे. दुसरीकडे, यूट्यूब पार्टनर प्रोग्राममध्ये आधीच समाविष्ट केलेल्या क्रिएटरला पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. यात सहभागी झालेल्यांना सुपर थँक्स, सुपर चॅट आणि सुपर स्टिकर्स यांसारख्या अनेक टूल्सचा वापर करता येईल. ते चॅनल सब्सक्रिप्शन टूलचा वापर करू शकतात आणि यूट्यूब शॉपिंगमध्ये त्यांच्या उत्पादनांना प्रमोटही करू शकतील.

तुम्हाला कॅमेरा फेसिंग करण्याची भीती वाटत असेल तरी तुम्ही आवाजासह व्हिडिओ एडिट करून अपलोड करू शकता.

# प्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर

आर्या अंबेकर एक मराठी पार्श्वगायक आणि नागपूर, महाराष्ट्रातील अभिनेत्री आहे. अर्याने जानेवारी २०१७ मध्ये ती सध्या काय करते या चित्रपटाद्वारे अभिनयात पदार्पण केले आहे. झी मराठी वाहिनीवर जुलै २००८ ते फेब्रुवारी २००९ दरम्यान सारेगमप मराठी लिटल चॅम्प्समध्ये पहिल्या सिझनला अंतिम फेरी गाठली.



## निमित्त

आर्यचा जन्म १६, जून १९९४ रोजी नागपुरात झाला. तिचे वडील समीर आंबेकर (डॉक्टर) आणि आई श्रुती आंबेकर गायक. आर्याची आजी, क्लासिकल गाणे गायची, आर्या दोन वर्षांची असताना आर्यामधील प्रतिभा त्यांनी ओळखली. आर्याने तिचे गुरु आणि आई श्रुती आंबेकर यांच्याकडून वयाच्या साडेपाच वर्षांच्या असताना संगीताचे प्रशिक्षण चालू केले.

वयाच्या सहाव्या वर्षी पहिल्या इयत्तेत असताना आर्याने संगीतात पहिली परीक्षा दिली. तिसरीत असताना आर्याने आंतरशालेय गायनाच्या स्पर्धेत भाग घेतला आणि आपल्या शाळेला पहिले पारितोषिक मिळवून दिले. आर्याने आतापर्यंत अनेक मराठी / हिंदी भाषा अल्बम्स तसेच काही मराठी चित्रपटांसाठी व नाटकांसाठी गाणी गायली आहेत.

२०१७ च्या सुरुवातीस प्रदर्शित झालेल्या 'ती सध्या काय करते' या चित्रपटातून तिने अभिनय कारकीर्दीस सुरुवात केली. यामध्ये तिने गायलेले हृदयात वाजे समथिंग हे गाणे प्रसिद्ध आहे.

सारेगमप लिटिल चॅम्प्स हा एक संगीत विषयक स्पर्धात्मक कार्यक्रम, झी मराठी या दूरदर्शन वाहिनीवर जुलै २००८ ते फेब्रुवारी २००९ या कालावधीत प्रसारित झाला. या कार्यक्रमासाठी वय वर्ष ८ ते १४ मधील मुलांच्या चाचण्या घेण्यात आल्या. आर्या सर्वोत्कृष्ट ५० स्पर्धकांमध्ये निवडली गेली, आणि सारेगमप लिटिल चॅम्प्स या कार्यक्रमाची एक स्पर्धक झाली. आर्याने आपल्या सुमधुर आवाज आणि सांगीतिक कौशल्याच्या जोरावर अंतिम फेरीत व नंतर महाअंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत १२ स्पर्धकांची निवड झाली तर महाअंतिम फेरीत पाच स्पर्धकांची निवड केली होती.

आर्याने या कार्यक्रमांमध्ये अनेक उत्तमोत्तम गाणी सादर केली. तिच्या पान खाये सैंया हमारो या गाण्याला परीक्षकांकडून वरचा नी पर्यंत (२०० टक्के) गुण मिळाले. हा विक्रम सारेगमपच्या त्या आधीच्या आठ पर्वात अबाधित होता. हिंदी सिनेसृष्टीतील नामवंत गायक हरिहरन हे त्या भागाचे परीक्षक होते.

**पुरस्कार**

माणिक वर्मा शिष्यवृत्ती, हरिभाऊ साने पुरस्कार, पुण्यरत्न युवा गौरव पुरस्कार, बिग मराठी रायाजिंग स्टार वॉर्ड (संगीत), यंग अचिवर्स वॉर्ड - विसलींग वूड्स ईंटरनॅशनल, डॉ. वसंतराव देशपांडे पुरस्कार, आर्या पुरस्कार, डॉ. उषा (अत्रे) वाघ पुरस्कार, विद्या प्राज्ञ पुरस्कार - ग. दि. मा. प्रतिष्ठान द्वारा, गोद्रेज फ्रेश फेस ऑफ द इअर - सह्याद्री नवरत्न वॉर्डस्, फेव्हरेट पार्श्वगायीका, ती सध्या काय करते चित्रपटातील 'हृद्यात वाजे समथिंग' या गाण्यासाठी - झी टॉकीजच्या महाराष्ट्राचा फेव्हरेट कोण या मध्ये फेव्हरेट नवोदित अभिनेत्री, झी चित्रगौरव पुरस्कार, सर्वोत्कृष्ट पार्श्वगायीका व सर्वोत्कृष्ट नवोदित अभिनेत्री, सूर ज्योत्सना राष्ट्रीय संगीत पुरस्कार.

**(साभार : मराठी बायोग्राफी)**

## क्लिक...क्लिक...!



**पुणे : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात दंग झालेल्या वारकऱ्यांची छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

# डायबिटीस पेशंटने कांदा खावा की नाही? जाणून घ्या



बहुतेक लोकांना डायबिटीसचा त्रास होताना दिसतो. दररोजचं धावपळीचं जीवन, तणाव, बदलती जीवनशैली, बदलता आहार अशा अनेक गोष्टींमुळे डायबिटीसची समस्या लोकांमध्ये निर्माण होतोना दिसतेय. डायबिटीस झाल्यानंतर ती नियंत्रणात आणण्यासाठी लोक अनेक वेगवेगळे उपाय करताना दिसतात. पण काही लोकांना हवा तसा रिझल्ट मिळत नाही. तर आता आपण अशा एका उपायाबाबत जाणून घेणार आहोत जो डायबिटीस नियंत्रणात आणण्यासाठी मदत करतो.

जर तुम्ही डायबेटीस नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न करत असाल तर कांद्याचा उपाय जरूर करा. तर आता हा कांद्याचा नक्की उपाय कोणता याबाबत आपण जाणून घेऊया. कांद्यामध्ये कॅल्शियम, आयरन, मॅग्नेशियम, विटामिन सी, फॉलेट, पोटॅशियम, फॉस्फरस, झिंक असे अनेक घटक असतात. हे घटक शरीरातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करतात. कांद्यात असलेल्या अँटिऑक्सिडंट सोबत फायबरची मात्र सुद्धा रक्तातील साखरेची पातळी नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.

**डायबिटीसची लक्षणे कोणती?**

डायबिटीस मध्ये भूक लागणे, एखादी जखम लवकर बरी न होणे, थकवा जाणवणे डोळ्यावर अंधारी येणे, इन्फेक्शन होणे, हात पाय दुखणे किंवा सूज येणे अशा प्रकारची अनेक लक्षणे असतात.

**डायबिटीस पेशंटला कांदा खाण्याचे फायदे**

कांद्यात असलेली फायबरची मात्रा डायबिटीस पेशंटसाठी खूप फायदेशीर असते. कारण कांद्यातील फायबर हे शरीरातील ग्लुकोजची मात्रा नियंत्रणात ठेवते आणि त्यामुळे रक्तातील साखर वाढत नाही.

डायबिटीज असलेल्या पेशंटना पचनाच्या बाबतीत अनेक समस्या निर्माण होतात. अशावेळी डायबेटीस पेशंटनी कांदा खाल्ला पाहिजे जेणेकरून अन्नपचन होण्यास मदत होते.

कांद्यात अँटिऑक्सिडंट असतात जे शरीरातील सूज कमी करण्यासाठी मदत करतात. त्यामुळे ज्या डायबेटीस पेशंटना सुजेची समस्या आहे त्यांनी कच्चा कांदा खाल्ला पाहिजे.

# रायगडातील शाळांची घंटा वाजली

## पुन्हा किलबिलाट सुरू; विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत





**अलिबाग : प्रतिनिधी**

उन्हाळ्याची सुटी संपल्यानंतर गुरुवार (दि. १५)पासून शाळा पुन्हा एकदा सुरू झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळांचा परिसर गजबजून गेला. शाळेचा पहिल्या दिवशी आपले सवंगडी भेटल्यामुळे मुले आनंदात होती.

शाळेचा पहिलाच दिवस असल्याने अनेक मुलांचे पालक त्यांना शाळेत सोडायला आले होते. त्यामुळे शाळांचा परिसर फुलून गेला होता. आपापले वर्ग शोधण्याची विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होती.

प्रथमच शाळेत येणाऱ्या विशेषतः रडणाऱ्या मुलांना आवरताना शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना कसरत करावी लागत होती. शासकीय शाळांमध्ये पुस्तकांचे वाटप करून मुलांचे स्वागत करण्यात आले. शिक्षण विभागाच्या आदेशानुसार नव्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शाळेविषयी आवड निर्माण व्हावी, त्यांच्यामध्ये आनंदी वातावरण निर्माण व्हावे या दृष्टिकोनातून प्रत्येक शासकीय शाळांमध्ये शाळा प्रवेश उत्सव उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी शालेय पुस्तकांचे वाटपही करण्यात आले.





**माणगाव, खोपोली : येथील रायगड जिल्हा परिषदेच्या उतेखोलवाडी शाळेत शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी प्रवेश उत्सवास येऊन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, गटविकासाधिकारी जठार, गटशिक्षण अधिकारी माणगाव सुनिता खरात, पशुसंवर्धन अधिकारी जाधव, घुले पंचायत समिती सहाय्यक अधिकारी वजीर चौगुले यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. त्याचप्रमाणे खोपोलीत शाळेच्या पहिल्याच दिवशी मुख्याध्यापिका तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या.** (छाया : सलीम शेख, जयवंत मांडपे)

# नांदगाव हायस्कूलमध्ये पाठ्यपुस्तकांचे वाटप




**मुरुड : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूल येथे गुरुवारी (दि. १५) सर्व शिक्षा अभियानांतर्गत इ. पाचवी ते आठवीमधील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सहजीवन विद्यामंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे हे होते. या वेळी मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ, सागर राऊत, राहील घलटे, प्रतीक पेडणेकर, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, रवींद्र ढोले, महादू अहिरे, दत्तात्रेय खुळपे, भरत चव्हाण, योगेश पाटील व सर्व शिक्षक उपस्थित होते.

शाळेत प्रथमच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा अध्यक्ष फैरोज घलटे यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांनी पाठ्यपुस्तकांचा सुयोग्य वापर करून पुस्तकाची काळजी घेण्याचे आवाहन केले, तर सहजीवन मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे यांनी नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांनी पुस्तक सुरक्षित राहण्यासाठी त्यांना कव्हर घाला तसेच वेळच्या वेळी अभ्यास करून आपला उत्कर्ष साधावा, असे म्हणाले.

तालुक्यात जिल्हा परिषद शिक्षण विभागातर्फे इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांकरीता १०६ शाळांना ५,२४५ संचाचे वाटप करण्यात आल्याची माहिती मुरूड तालुका गट शिक्षण अधिकारी सुनील गवळी यांनी दिली. मराठी माध्यमाचे ४,३४८ संच व उर्दू माध्यमाचे ८९७ संच उपलब्ध झाले होते.

हे एकूण ५,२४५ पाठ्यपुस्तक संच सर्व जिल्हा परिषद शाळा, सर्व नगरपालिका शाळा तसेच खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत वाटण्यात आले असून एकूण १०६ शाळेतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# स्वयंरोजगार कौशल्य कार्यशाळेला प्रतिसाद

**कर्जत :** कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालयची योजना जन शिक्षण संस्थान रायगड यांच्या माध्यमातून नेरळ व अलिबाग येथे गुरुवारी (दि. १५) प्रशिक्षणार्थींसाठी बॅग मेकिंग, वेल्डिंग, प्लम्बिंग, इलेक्ट्रीशन व उद्योजकता विकास मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली.

संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याभरात जेएसएसच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात आहे. या कार्यशाळेसाठी संचालक डॉ. विजय कोकणे, प्रकल्प अधिकारी शशिकांत धनोडेकर, उद्योजक व समाजसेवक मयुर पिसेकर, अकाऊंटंट कम मॅनेजर प्रतीक्षा चव्हाण, प्रशिक्षिका गणेश्री भोपी, रंजना भोपी, प्रशिक्षक गणेश भोपी, प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**EXTENSION TO E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027615** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-31/2023-2024. Extension to RFx E-Tender for work of strength evaluation survey (Structure stability) of tower pile foundation from Loc no. 666 to 670 in CBD Belapur Creek area of 220KV TSS – Kharghar – Topworth D/C Line under EHV under EHV Lines S/Dn., Panvel under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount**: Rs. 1,84,729/- **EMD:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 15.06.2023, 17:00 Hrs to 21.06.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 21.06.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 22.06.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
Executive Engineer
EHV (O&M) Dn., Panvel



**महावितरण**

**निविदा सूचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत नवीन सेवा जोडण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास **(NSC)** योजनेकरिता एक वर्षाच्या करारासाठी परवानाधारक विद्युत ठेकेदारांची नामिकाप्रविष्ट **(Empanelment)** करणेसाठी ई-निविदा क्रमांक **टी-०६** महावितरण कंपनीच्या **https://etender.mahadiscom.in/eatApp/** संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि. **१५.०६.२०२३ ते २२.०६.२०२३ (रात्रौ ११.५० वा.)** पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. **२२.०६.२०२३ ला रात्री ११.५५** वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत/ शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

**कार्यकारी अभियंता**
**अलिबाग विभाग**

**PRO No. 250 Dtd.14.06.2023**



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थांचा सन २०२३ ते २०२८ या कालावधीतील पंचवार्षिक निवडणूकीसाठी निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थांची नावे १. कल्पतरु रिव्हरसाईड फेज–१, बिल्डींग नं. ३ व ४ सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., पनवेल ता.पनवेल जि.रायगड २. महात्मा को. ऑप. क्रेडीट सोसायटी सहकारी संस्था मर्या. खांदा कॉलनी पनवेल ता.पनवेल, जि.रायगड. ३. श्री ज्ञानेश्वर माथाडी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पनवेल ता.पनवेल जि.रायगड सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १९/०६/२०२३ ते २३/०६/२०२३, नामनिर्देशन पत्र छाननी दि. २६/०६/२०२३, नामनिर्देशन पत्र माघारी दि. २७/०६/२०२३ ते ११/०७/२०२३ व आवश्यकतेनुसार मतदान अनुक्रमे दिनांक २३/०७/२०२३, १८/०७/२०२३, व २०/०७/२०२३ रोजी घेण्यांत येईल तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणूकीबाबत सूचना व अधिक माहीती संस्थेचे कार्यालयांत व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी, पनवेल, पहिला मजला, कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, रायगड बाजारच्या बाजूला पनवेल जि. रायगड ४१०२०६ यांचे कार्यालयांत पहावयास मिळेल तरी संस्थेच्या सभासदांनी याची नोंद घ्यावी.

**सही/–**
**(निता पुगांवकर)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**

**सही/–**
**(विजय सडके)**
**निवडणूक निर्णय अधिकारी**


# रोह्यातील वैशालीनगर बौद्धवाडी ग्रामस्थांचे पाण्यासाठी धरणे

**रोहे : प्रतिनिधी**



रोह्याची जीवनवाहिनी म्हणून ओळख असलेल्या व बारमाही वाहणारी कुंडलिका नदीजवळ असलेल्या वैशालीनगर बौद्धवाडी (तळाघर) येथे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्याने ग्रामस्थांनी पाण्यासाठी गुरुवारी (दि. १५) तहसील कार्यालयाच्या आवारात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे.

गेली १३ वर्षे वैशालीनगर बौद्धवाडी येथे पाण्यासाठी संघर्ष चालू आहे. तहसील कार्यालयासमोर जनता दल सेक्युलरचे संदेश गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे योगेश गायकवाड, तळाघर वैशालीनगर बौद्धवाडीचे अध्यक्ष राजेश गायकवाड, भारतीय बौद्ध महासभाचे मनोहर शिंदे, मारुती शिंदे आदी प्रमुख कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी धरणे आंदोलन सुरू केले आहे. बारमाही वाहणारी कुंडलिका नदीशेजारी असताना ग्रामस्थांना मात्र पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला असेल तर मोठी शोकांतिका आहे, बोलले जात आहे.


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जिल्हा–रायगड, पनवेल ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२– २७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२– २७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२–२७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२– २७४५५७५१
ई–मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट : www.panvelcorporation.com

जा.क्र.प.महा/पर्या./३९२३/प्र.क्र.०९/८२/२०२३ दिनांक :– १५/०६/२०२३

### जाहीर नोटीस

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये पर्यावरण पूरक घरगुती / सार्वजनिक गणेशोउत्सवा करीता डेटा व्यवस्थापन सेवा आणि सुलभ विसर्जन व्यवस्थापन समाधान प्रदान त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणुन नेमणूक करणेकामी तातडीने इच्छुक पुरवठा धारक / व्यक्ती यांचेकडून जाहीर निविदा मागवित आहेत.

संबंधितानी त्यांची सिलबंद निविदा महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागात दिनांक २६/०६/२०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावीत. सदर तारखेनंतर आलेली निविदा विचारात घेतली जाणार नाहीत.

| अ. क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम | कामपुर्णत्वाचा कालावधी | अनामत रक्कम | निविदा प्रपत्रकाराची किंमत |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये पर्यावरण पूरक घरगुती / सार्वजनिक गणेशोत्सवा करीता डेटा व्यवस्थापन सेवा आणि सुलभ विसर्जन व्यवस्थापन समाधान प्रदान त्रयस्थ संस्थेची सल्लागार म्हणुन नेमणूक करणेबाबत. | रू.१०,००,०००/– | कार्यादेश दिल्यापासून काम पूर्ण होईलपर्यंत | रू. १०,०००/– | रू. ५९०/– ( GST सह) |

निविदाच्या अटी व शर्ती आणि इतर माहीती पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागास पाहावयास मिळतील.

**सही/–**
**(डॉ.प्रशांत रसाळ)**
अतिरिक्त आयुक्त– ( I )
पनवेल महानगरपालिका


# 'विजेच्या पोलची तपासणी करावी'

**मुरुड : प्रतिनिधी**

शहरातील मारुती नाका परिसरात वीज पोलला स्पर्श झाल्याने नुकताच एका गाईचा मृत्यू झाला होता. या घटनेमुळे नागरिक संतप्त झाले होते. त्यामुळे महावितरणने या प्रकरणाची दखल घेऊन तातडीने उपाययोजना करावी अशी मागणी होत आहे.

सामाजिक कार्यकर्ते अरविंद गायकर व दुकानदार असोसिएशनचे अध्यक्ष जाहीद फकजी यांनी शिष्टमंडळासह महावितरणचे उपकार्यकारी अभियंता महादेव दातीर यांची भेट घेतली.

यावर महादेव दातीर यांनी सांगितले की, शहरातील सर्व पोल तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले असून लवकरच या समस्येचे निरसन करण्यात येणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक **मे. नोबल इस्टेट्स तर्फे भागीदार जिया अ. सत्तर नम्रे** यांच्या मिळकतीत महाराष्ट्र शासन AKBSNA च्या मंजुर विकास अराखडा क्र. TPS -1204/941/ CR-163/04/4D12 दिनांक २५ जुलै २००५ नुसार २४ मीटर रूंदीचा रस्ता दर्शविला आहे व मंजुर UDCPR क्र. TPS 1818 /2CR-236/18/ SEC-37/ 1AA/ UD-13) दिनांक ०२ / १२ / २०२० नुसार २४ मीटर रूंदीचा डी. पी. रोडने बाधित जागेच्या बदल्यात पनवेल महानगरपालिकेक्कडुन टीडीआर घेण्याचे आहे.

सदर मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याबाबत आमच्या अशिलांना हमी व भरवसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कोणाचेही खरेदी, विक्री, गहाण, दान, लीज, लोन, साठेखत, कोर्ट हुकूम, वारसाहक्क, ताबे – वहिवाट अथवा कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार असल्यास याबाबत सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी व योग्य त्या कागदपत्रांसह खात्री करून घ्यावी. कार्यालयाचा पत्ता – **गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स, श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड – ४१०२०६,** या पत्यावर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजण्यात येईल, तसेच ज्याचा हक्क असल्यास, त्याचे तो जाणीवपुर्वक सोडुन दिलेला आहे असे समजून आमचे अशिल पुढील हस्तांतरणाची कार्यवाही पुर्ण करतील. तद्नंतर कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तथा चालणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**–: मिळकतीचे वर्णन :–**
**मौजे पिसार्वे, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | भुधारणा पध्दती | एकूण क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पैसे | २४ मीटर DP चौ. मी. |
|---|---|---|---|---|
| १४६/३ | भो वर्ग – १ | ०–३४–१० | २.८२ | ८९०.७० |

पनवेल,
दिनांक :– १६/६/२०२३

**सही/–**
**ॲड. अतिश सुनिल परदेशी**
**ॲड. हायकोर्ट**
गाळा नं. ७, फडके नाटयगृह कॉम्प्लेक्स,
श्री समर्थ कृपा झेरॉक्स, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड,
मोबा. नं. ९७०२८९८९८९



## पेण नगर परिषद, पेण

**जाहीर निविदा २०२३-२४**
**पेण- रायगड**

पेण नगरपरिषद, पेण जि.रायगड यांजकडून खालील कामांसाठी अनुभवी व इच्छुक व्यक्ति/संस्था/कंपनी यांजकडून निविदा/दरपत्रक मागविणेत येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नांव | संख्या | अंदाजपत्रकीय रक्कम | अनामत रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | आरोग्य विभागासाठी स्टेनलेस स्टील ट्विनबिन पुरविणे.. | २० | ५,००,०००/– | रु.५०००/– | १५ दिवस |

**:– कामाच्या अटी व शर्ती :–**

१. निविदा विक्री कालावधी दि. १६/०६/२०२३ ते २३/०६/२०२३ ४.०० वाजेपर्यंत कार्यालयात (सुट्टीचे दिवस वगळता) मिळतील
२. निविदा जमा करण्याचा कालावधी दि. २३/०६/२०२३ सायं. ५.०० वाजेपर्यंत
३. निविदा उघडण्याचा कालावधी दि. २६/०६/२०२३ रोजी ११.०० वाजता अथवा प्रशासकीय सोयीनुसार.
४. सदर निविदा या द्वि लिफाफा पद्धतीने सादर करणेचे आहेत. **लिफाफा क्रमांक १** मध्ये सदर क्षेत्रातील नोंदणी प्रमाणपत्र, पॅनकार्ड, इसारा रकमेची छायांकित प्रत व परिशिष्ट अ इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. तसेच **लिफाफा क्रमांक २** मध्ये दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.
५. या बाबतची अधिक माहिती नगरपरिषदेचे आरोग्य विभागात कार्यालयीन वेळेत उपलब्ध होईल.

**जा.क्र.पेनप/का.५/आवि/२०२३/९६८**
**दिनांक :– १५/०६/२०२३**

**सही/–xxx**
**मुख्याधिकारी**
**पेण नगर परिषद, पेण**



**– जाहीर पेपर समन्स प्रतिवादी नं. १/१ करीता –**

मा. न्यायाधीश सहकारी न्यायालय रायगड, रत्नागिरी मु. अलिबाग, यांचे न्यायालयांत (रायगड, रत्नागिरी जिल्हा)

मुकदमा क्रमांक/सी.सी./आरजीडी/८८/२०२१

दि. पनवेल को. ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.,पनवेल
तर्फे, अधिकारी,
श्री. नितीन जीवन पाटील,
रा. कार्यालयीन पत्ता, कापडबाजार – पनवेल ..... **वादी**
मु. पो. ता. पनवेल, जि. रायगड

**विरुध्द**

१) श्री. मो. जाहीद मो. मोहसिन पटेल, **मयत तर्फे वारस**
**१/१. श्रीमती शबाना मो. जाहीद पटेल** ..... **प्रतिवादी**
रा. मु. ४२, नौमणी मस्जिद जवळ, तळोजा पाचनंद,
ता. पनवेल, जि. रायगड, पिन – ४१०२०८

२) श्री. हरेश मनोहर केणी,
रा. मु. पेठाली, पो. तळोजा,
ता. पनवेल, जि. रायगड, पिन– ४१०२०८

३) श्री. संदीप गोविंद केणी, मु. पेठाली, पो. तळोजा,
ता. पनवेल, जि. रायगड, पिन – ४१०२०८

दावा रक्कम रुपये ४,१४,३८८/– ( अक्षरी रक्कम चार लाख चौदा हजार तीनशे अठ्ठयाऐंशी मात्र) चे वसुलीचा

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दिनांक ०३/०७/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीशी अन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दिनांक १५/०६/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

**कोर्टाचा पत्ता :–** सहकारी न्यायालय रायगड – रत्नागिरी, 'सहकार भवन'
(रा.जि.प्रा. शिक्षक सह पतसंस्था मर्या. अलिबाग कॅम्पस )
दुसरा मजला ब्राम्हण आळी, अलिबाग एस.टी.स्टँड समोर,
मु. पो. ता अलिबाग– रायगड – ४०२ २०१.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**ज्युडिशिअल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# गॅस पाईपलाईनमुळे पडलेले खड्डे ‘जैसे थे’

## अपघातांना आमंत्रण; रस्ते पूर्ववत करण्याची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका हद्दीत व करंजाडेमध्ये महानगर गॅसची पाईपलाईन टाकण्यासाठी रस्त्याच्या बाजूला खणलेले खड्डे ठेकेदाराने व्यवस्थित न बुजवल्याने त्याठिकाणी पहिल्या पावसातच तयार झालेल्या खोल खड्ड्यांमुळे अपघात होत आहेत. यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे लवकरात लवकर हे खड्डे बुजविण्यात याचे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.



पनवेल महापालिका हद्दीत व करंजाडेमध्ये महानगर गॅस कंपनीतर्फे प्रत्येक सोसायटीत पाईपद्वारे गॅसपुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी महानगर गॅस कंपनीतर्फे पाईपलाईन टाकण्याचे काम अनेक महीने सुरू आहे. हे काम सुरू असताना महापालिका हद्दीतील दि. बा पाटील शाळेजवळील रस्ता आणि सिडकोने कारंजाडेत केलेले रस्ते अनेक ठिकाणी फोडण्यात येऊन तेथून गॅसची पाईप लाईन टाकण्यात आली. येथील काम झाल्यावर ठेकेदाराने फोडलेले रस्ते नियमाप्रमाणे पुन्हा व्यवस्थित करून द्यावयाचे असतात.

ठेकेदाराकडून सिडको व महापालिका रस्ते फोडण्याला परवानगी देण्यापूर्वी अनामत रक्कम घेऊनच ठेकेदाराला परवानगी देत असते. महानगर गॅस कंपनीच्या ठेकेदाराने अनेक ठिकाणी काम झाल्यावर रस्त्यावरील खड्डे व्यवस्थित न भरल्याने पहिल्या पावसातच त्या ठिकाणी मोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामध्ये पावसाचे पाणी साठल्याने त्याच्या खोलीचा अंदाज येत नाही. त्यामुळे अनेक दुचाकीधारक तेथे पडून जखमी होत आहेत. त्यांच्या गाडीचेही नुकसान होत आहे. या अपघातात एकाद्याला आपला जीव ही गमवावा लागू शकतो, असे झाल्यास संबंधित ठेकेदार आणि संबंधित महापालिका किंवा सिडकोच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.

**करंजाडेमध्ये महानगर गॅसची पाईपलाईन टाकण्यासाठी रस्त्याच्या बाजूला खणलेले खड्डे ठेकेदाराने व्यवस्थित न बुजवल्याने सेक्टर ६मधील बस स्टॉपसमोर मोठा खड्डा पडला आहे. पावसाच्या साचलेल्या पाण्यामुळे तो लक्षात येत नाही. त्यामुळे दोन दिवस त्या खड्ड्यात अनेक दुचाकीवाले अडकून पडले, जखमी झाले. त्यांच्या गाडीचेही नुकसान झाले याला जबाबदार ठेकेदार व अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदवला पाहिजे.**

**–सुधीर पाटील, करंजाडे**

**करंजाडेमधील रस्त्याचे खड्डे भरण्यासाठी आम्ही टेंडर काढले आहे. ते खड्डे आम्ही भरून घेऊ. ते काम होऊन जाईल.**

**–अर्जुन अनुसे, सुप्रिटेंडंड इंजिनियर, सिडको**

**पनवेलमधील महानगर गॅस कंपनीचे काम पूर्ण झाले असून ते दोन दिवसांत टेस्टिंग करून काम पूर्ण झाल्याचे कळविणार आहेत. त्यानंतर लगेच आपण खडी टाकून तेथील रस्ता करून घेऊ.**

**–संजय कटेकर, कार्यकारी अभियंता, पनवेल महापालिका**

# महिलेचा खून करणाऱ्या आरोपीसह साथीदार अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

महिलेचा मृतदेह ओढणीने गळा आवळून बेडशिटमध्ये गुंडाळुन, तसेच प्लास्टीकच्या गोणीमध्ये भरून सेलोटेप लावून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने रेतीबंदर मुंब्रा येथील विसर्जन घाट येथ फेकुन दिला होता. त्याबाबत मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला होता. गुन्यातील मुख्य आरोपीस पश्चिम बंगाल येथू तर त्याच्या साथीदारास मुंबई येथून अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी मृतदेह आढलेल्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे सीसीटीव्ही फुटेज प्राप्त केले. यामध्ये त्यांना घटनास्थळावर एका तीन चाकी टेम्पोच्या संशयास्पद हालचाली दिसुन आल्या, परंतु टेम्पोचा क्रमांक अस्पष्ट दिसत असल्याने संशयीत टेम्पो ज्या दिशेने गेला त्या मार्गावरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले नंतर



संशयीत टेम्पो (एमएच०२-एफएल-२९०३) मिळुन आला. त्यावरून टेम्पोची ओळख पटली. टेम्पो नबाब नुरु शेख (रा. वर्सोवा, अंधेरी) याच्या नावावर असल्याची माहिती प्राप्त केली.

मिळालेल्या पत्त्यावर जावुन पोलिसांनी तेथे राहणारे भाडेकरूला मयत महिलेचा फोटो दाखविला असता त्यांनी ही नबाब नुरु शेख याची पत्नी असल्याचे सांगितले, मात्र नवाब शेख हा त्याचे मुळ गांव मुर्शीदाबाद, पश्चिम बंगाल येथे पळुन गेल्याची माहिती मिळाल्याने तत्काळ पोलीस पथक पश्चिम बंगाल येथे रवाना झाले.

पोलिसांच्या दुसऱ्या पथकाने वर्सोवा, अंधेरी मुंबई येथे जावुन घटनास्थळाचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून त्याचे निरीक्षण केले असता नवाब शेख यांच्यासह एक व्यक्तीच्या संशयास्पद हालचाली आढळुन आल्याने, त्याचा शोध घेवुन त्यास वर्सोवा येथून ताब्यात घेतले. सलमान उर्फ रज्जन कुल्लु खान (वय-२० वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. जुहु गल्ली, अंधेरी पश्चिम) असे त्याच्या साथीदाराचे नाव आहे.

## निवडक

### नवी मुंबईत २५ ठिकाणी फ्लॅश मॉब



**नवी मुंबई :** अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईतील अनेक ठिकाणी फ्लॅश मॉबद्वारे वैद्यकीय आणीबाणीचा सामना करण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याबाबत जागरुकता वाढवत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून अपोलोने नवी मुंबईत २५ वर्दळीच्या ठिकाणी फ्लॅश मॉबद्वारे लोकांना जागरूक केले. बेलापूर पोलीस स्टेशन, घणसोली बस डेपो, ग्रँड सेंट्रल मॉल-सिवूड, डी-मार्ट कोपरखैरणे, नेरूळ आणि वाशी रेल्वे स्टेशन या ठिकाणी १५-२० मिनिटांचा फ्लॅश मॉब घेण्यात आला. पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी आपत्कालीन काळजी घेणे आवश्यक आहे. या संकल्पनेवर जागरूकता निर्माण करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे, असे अपोलो हॉस्पिटल्सचे पश्चिम विभाग, प्रादेशिक सीईओ संतोष मराठे यांनी सांगितले.

### तांबोळी कुटूंबाने जिंकली पैठणी

**मोहोपाडा :** झी मराठीवरील होममिनिस्टर होममिनिस्टर मालिकेत ननंद बाईंची स्वारी वहिनीच्या घरी या मालिकेत मोहोपाडा येथील प्राची प्रशांत तांबोळी (ननंद), स्वानंदी साईंनाथ तेलवणे (वहिनी) यांच्या मालिकेत प्राची प्रशांत तांबोळी यांनी मानाची पैठणी जिंकली तर उपविजेत्या ठरलेल्या स्वानंदी साईंनाथ तेलवणे यांना भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. मयुरी अक्षय तांबोळी (वहिनी), राधिका राहूल जगे (ननंद) यांच्या होममिनिस्टर मालिकेत मयुरी तांबोळी यांनी उत्कृष्ट खेळ करून मानाची पैठणी जिंकली. तल राधिका राहूल जगे या उपविजेत्या ठरल्या. त्यांना होममिनिस्टर मालिकेतील आदेश बांदेकर यांच्या हस्ते पैठणी व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.



# ऑनलाईन गोल्ड व वाईन ट्रेडिंगमध्ये कामोठ्यात एकाला सव्वा कोटीचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

ऑनलाईन गोल्ड व वाईन ट्रेडिंग करण्यास भाग पाडून कामोठेमधील एका व्यक्तीची एक कोटी ३८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी दहा जणांविरोधात माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत व फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

कामोठे परिसरात राहणाऱ्या थॉमस नावाच्या व्यक्तीबरोबर नोव्हेंबर २०२० मध्ये निकोल लीन नावाच्या महिलेने व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मैत्री केली होती. वेळोवळी संवाद साधून विश्वास संपादन केला व गोल्ड ट्रेडिंग करण्याचे आवाहन केले. त्यासाठी मोबाइलवर मालामो अॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. सुरुवातीला ५० हजार रुपये गुंतवणूक केल्यानंतर ५४ हजार रुपये परत मिळाले. नोव्हेंबर २०२० ते फेब्रुवारी २०२१ पर्यंत १५ लाख रुपयांचे ट्रेडिंग केले. परंतु, काहीही परतावा मिळाला नाही. यानंतर मार्च २०२१ मध्ये निकोल लीन हिने पुन्हा संपर्क साधला, झालेले नुकसान भरून काढण्यासाठी सोबत काम करू असे आवाहन करून जीआयसी मोबाईल अॅपवरून वाईन ट्रेडिंग करण्यास सांगितले. मार्च ते जुलै २०२१ दरम्यान १ कोटी २३ लाख ७० हजार रुपयांची वाईन ट्रेडिंग केले आहेत. संबंधित अॅपवर २० कोटी ९५ लाख रुपये दाखविले जात होते.

यामधील काही रक्कम काढण्याची विनंती केल्यानंतर निकोल हिने पुष्कर ठाकूरच्या खात्यावर पुन्हा रक्कम भरण्यास सांगितले. यामुळे पैसे काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, पैसे मिळाले नाहीत. या प्रकरणी निकोल लीन, विजय हरीयाणी, विजय छटलानी, जगदीश वर्मा, बिना रानी, सुमीत चंद्रषर्मा, लाड देवी वैष्णव बैरागी, अर्जुन थारू, धनोजकुमार यादव व पुष्कर ठाकूर यांच्याविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

# टीसीला धक्काबुक्की करणाऱ्या तरुणाला २६ हजारांचा दंड

**नवी मुंबई : बातमीदार**

विनातिकीट प्रवास करताना पकडल्यानंतर टीसीने दंड भरायला सांगितल्यामुळे टीसीला धक्काबुक्की करणाऱ्या एका तरुणाला न्यायालयाने तब्बल २६ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. या दंडातील पाच हजार रुपये हे टीसीला नुकसान भरपाई म्हणून देण्याचे आदेश सत्र न्यायालयाने दिले आहेत.

४ फेब्रुवारी २०२० रोजी उल्वे येथे राहणारा राहुल (नाव बदलले आहे) हा तरुण हा पनवेलवरून सीएसएमटीला जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढला. सीवूड्स स्टेशनला तो उतरला तेव्हा त्याला टीसी जोसेफ पेटेरप्पा व टीसी सुनील कुराने यांनी तिकीट दाखवण्यास सांगितले. त्यावेळी राहुलने त्यांना युटीएसच्या एका तिकीटाचे स्क्रिनशॉट दाखवले. मात्र टीसींनी स्क्रिनशॉट घेतलेले ते तिकीट अवैध ठरवले व त्याला अॅपवरून तिकीट दाखवण्यास सांगितले. मात्र अॅपवरील तिकीट त्याच्याकडे नसल्याने टीसींनी त्याला दंड भरण्यास सांगितला. राहुल त्यावरून चिडला व त्याने टीसींसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. या वादातून राहुलने टीसी पेटरप्पा यांना धक्काबुक्की केली.

याप्रकरणी टीसींनी राहुलविरोधात वाशी पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली. याप्रकरणी न्यायालयाने राहुलला २० हजार रुपयांचा दंड व पाच हजार रुपये टीसी पेटरप्पा यांना नुकसान भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

# मोहोपाडा येथे गायीचा मृत्यू; गोरक्षक बजरंगींच्या डोळ्यांत अश्रू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी-दांड रस्त्यावरील मोहोपाडा येथील मिनिडोअर स्टॅण्डजवळ बुधवारी सकाळी गाय रस्त्यालगत पडल्याने रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांनी पाहण्यासाठी गर्दी केली होती. गोरक्षक बजरंगीकडून या गायीला जीवदान देण्यासाठी बरेच प्रयत्न करण्यात आले, मात्र ते अयशस्वी ठरले.

गायीने प्लास्टिक खाल्ल्याने तिचे पोट मोठे झाले असावे असा नागरिकांनी अंदाज बांधला होता. काही वेळात तिची हालचाल मंदावल्याचे नागरिकांनी पाहिले, या वेळी काहींनी गोरक्षक बजरंगी बांधवांना फोन करून गोरक्षकांना ही हकिकत सांगितली. या वेळी गोरक्षक मलेश गुडसे व बजरंगी बांधवानी घटनास्थळी जाऊन तत्काळ पशुवैद्यकीय डॉ. प्रशांत कोकरे यांना बोलावून गायीवर उपचार सुरू केले. या वेळी पशुवैद्यकीय डॉक्टरांनी गाईंच्या पोटात गॅस असल्याने सांगत तसे उपचार सुरू केले. सायंकाळपर्यत गायीच्या तब्येतीत बदल न झाल्याने



बजरंगी बांधवानी पुन्हा पेण येथील डॉ. कांबळे यांना बोलावून घेतले. डॉ कांबळे यांनी गायीवर उपचार सुरू केले. काहीवेळ गायीच्या तब्येतीत सुधारणा झाली, परंतु रात्रीच्या सुमारास गाईंची प्राणज्योत मावळली.

या वेळी रसायनी बजरंग दलाच्या जवानांनी जेसीबी आणून खोल खड्डा खोदून गायीवर अंत्यसंस्कार केले. या वेळी अनेक बजरंगी बांधवांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाल्याचे चित्र दिसून आले.

# ज्येष्ठ नागरिक संघात किंजवडेकर स्मृती व्याख्यानमाला

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरूळ येथील नेरूळ ज्येष्ठ नागरिक सार्वजनिक ग्रंथालय तसेच रुग्णसेवा केंद्र (जे. एन. एस.) यांच्या संयुक्त विद्यमाने कै. डॉ. शं. पां. किंजवडेकर स्मृति व्याख्यानमालेचा सोमवारी संघाच्या श्री गणेश सभागृहात, मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात शुभारंभ करण्यात आला. ग्रंथालयाचे अध्यक्ष विकास साठे यांच्या संकल्पनेतून ही व्याख्यानमाला साकार झाली असून तिच्या यशस्वीतेसाठी ग्रंथालयाच्या सर्व कार्यकारिणीने प्रचंड मेहनत घेतली व उपक्रम यशस्वी केला.

या संपूर्ण व्याख्यानमालेचे प्रायोजकत्व ज्येष्ठ नागरिक संघ नेरूळ या सामाजिक संस्थेने स्वीकारले असून यातील पहिले पुष्प १२ जून २०२३ रोजी अवयव दान व नेत्रदान हे पुष्प श्रीपाद आगाशे यांनी अभ्यासपूर्ण पद्धतीने गुंफले. अवयवदान व नेत्रदान या संदर्भात श्रोत्यांच्या प्रश्नांची उत्तरे देऊन शंका समाधान केले.

व्याख्यानमालेचे उद्घाटन डॉ. किंजवडेकर यांच्या सुविद्य कन्या श्रीमती तेजस्विनी अधिकारी यांनी केले. या कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. त्यामध्ये महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम)चे अध्यक्ष अरुण रोडे यांनी ही व्याख्यामाला पूर्ण महाराष्ट्रात सुरू झाली पाहिजे व डॉक्टरांचे कार्य सगळ्या महाराष्ट्राला समजले पाहिजे असे सांगितले. अखिल भारतीय वरिष्ठ नागरिक महासंघ (एस्कॉन)चे अध्यक्ष प्राध्यापक वि. के. भदाणे यांनी नेत्रदानाच्या चळवळीची व्याप्ती वाढवली पाहिजे तसेच जनजागृती झाली पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पांडुरंग क्षेत्रमाडे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात या उपक्रमाचे कौतुक केले.

या कार्यक्रमास विविध मान्यवर उपस्थित होते. सीमा आगवणे यांनी मान्यवरांचे तसेच श्रोत्यांचे यथोचित आभार मानले. विकास साठे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



# बैलगाडी होतेय नामशेष

## व्यावसायिकांवर बेकारीची कुऱ्हाड

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

बदलत्या काळात दळणवळणाच्या साधनांमध्ये कमालीची वाढ झाल्यामुळे, दळणवळणातील पहिले जुने आणि महत्त्वाचे असे साधन असणाऱ्या बैलगाडी व्यावसायिकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. दरम्यान, उरण तालुक्यात बैलगाडी कालबाह्य होत चालली असून ती नामशेष होण्याच्या मार्गावर आहे.

याबाबत चिरनेरचे बैलगाडीच्या पारंपारिक व्यावसायातील बैलगाडीचे मालक रघुनाथ चिंतामण नारंगीकर यांच्याशी याबाबत संवाद साधला असता त्यांनी उरण तालुक्यातील चिरनेर पूर्व विभागात आता मोठ्या प्रमाणात कंटेनर यार्ड उभे राहत असून, येथील वाल, चवळी कडधान्य पिकणारी आणि भाताचे मुख्य पीक देणारी सोन्यासारखी शेतजमीन आता मातीच्या



भरावाखाली आली आहे.

दरम्यान चिरनेर गावात बैलगाडी आणि पशुधन सांभाळणारी, अनेक घराणी होती, परंतु कालांतराने दळणवळणातील आधुनिक साधनात मोठ्या प्रमाणात वाढ होऊ लागली. आणि दळणवळणातील जलद आणि वेगवान अशा अत्याधुनिक वाहनांचा काळानुसार सर्वत्र सर्रास वापर होऊ लागला आहे. त्यामुळे बैलांच्या साह्याने, ओढले जाणारे दोन चाकांचे बैलगाडीचे वाहन या अत्याधुनिक दळणवळणाच्या साधनातून, मागे पडले आहे.

चिरनेर पूर्व विभागात सध्या जे काही भात शेतीच्या लागवडीखालील क्षेत्र शिल्लक राहिले आहे. या शेतीतदेखील शेतकरी शेतीची नांगरणी करण्यासाठी पावर टिलरचा वापर करत आहेत. त्यामुळे आमचे चार दोन बैलांचे नांगर आहेत. या नांगराची मागणीदेखील थांबली आहे. गावात रिक्षा, टेम्पो या वाहनांच्या प्रमाणात वाढ झाली असल्यामुळे, या जलद आणि वेगवान वाहनांना लोक अधिक पसंती देत आहेत. त्यामुळे दळणवळणातील बैलगाडीचे वाहन मागे पडले आहे. बैलगाडीला भाडेच राहिले नसल्यामुळे. येथील बहुतांशी पिढीजात बैलगाडी व्यावसियिकांनीआपला पारंपारिक बैलगाडीचा व्यवसाय बंद केला आहे. त्यामुळे आम्हा बैलगाडी व्यावसियिकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे.

**बदलत्या काळात आमच्या बैलगाडीच्या वाहनाला अजिबात भाडे राहिले नाही. त्यामुळे आमच्यावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे, मात्र यापूर्वीच्या आमच्या घराण्यातील कुटुंबियांचे उपजिविकेचे बैलगाडी हे प्रमुख साधन होते. या बैलांच्या जीवावर आमच्या संसाराचा गाडा ओढला जात होता. याची जाण ठेवून, माझे बैलावरचे प्रेम काही कमी होत नाही, म्हणून मला जेवढे दिवस या बैलांचा सांभाळ करता येईल, तोपर्यंत मी बैलांना सांभाळून, त्यांची निगा राखणार आहे.**

**–रघुनाथ चिंतामण नारंगीकर, बैलगाडी व्यावसायिक, चिरनेर**

# गुटखा विक्री करणारा ताब्यात

## टेम्पोसह २० लाखांचा मुद्देमाल जप्त

**पनवेल : वार्ताहर**

शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व इतर सुगंधी तंबाखू, पान मसाला यांची टेम्पोमधून विक्री करणाऱ्या एका व्यक्तीस गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाने पनवेल शहर परिसरातून अटक केली आहे. त्याच्याकडून पोलिसांनी १४ लाख ४२ हजार रुपये किमतीचा गुटखा व इतर सुगंधी तंबाखू यांच्यासह टेम्पो असा एकूण २० लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याच्या इतर दोन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.

पनवेल शहरातील साईनगर परिसरातील वाली सोसायटीसमोर शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा व इतर सुगंधी तंबाखू, पान मसाला असा नशाकाराक पदार्थांची विक्री करण्यासाठी काही इसम येणार असल्याची माहिती गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाच्या पथकाला गुप्त बातमीदाराकडून मिळाली होती. त्यानुसार गुन्हे शाखा मध्यवर्ती कक्षाचे वपोनि माणिक नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संजय रेड्डी आणि त्यांच्या पथकाने सापळा रचून आरोपी हरीश्चंद्र दास (वय २८) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून पोलिसांनी १४ लाख ४२ हजार रुपये किमतीचा गुटखा व इतर सुगंधी तंबाखू यांच्यासह टेम्पो असा एकूण २० लाखाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपीकडे केलेल्या अधिक चौकशीत त्याने हा मालाचा साठा मुसफ उर्फ मुशरफ याला विक्री करीता देण्यासाठी आणल्याचे सांगितले. आरोपी बाबा आणि मुसफ उर्फ मुशरफ या त्याच्या दोन साथीदारांचा शोध पोलीस घेत आहेत.

# ताम्हिणी घाटातील दरडीचा धोका कायम

## धोकादायक वळणे, संरक्षक भिंती कमकुवत; प्रवाशांचा जीव टांगणीला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव-पुणे महत्त्वाच्या राज्यमार्गावरील ताम्हिणी घाटात रस्त्याच्या कडेला मोठ्या दरडी आहेत. या दरडी पावसाळ्यात भिजून त्या ठिसूळ होतात. त्यामुळे दरडी कोसळण्याचा धोका दरवर्षी पावसाळ्यात कायम असतो. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने लक्ष घालून या मार्गावरील धोकादायक वळणे, कमकुवत असणाऱ्या संरक्षक भिंती या दुरुस्ती करणे गरजेचे होते, मात्र याबाबत उपययोजना केल्या नसल्याने प्रवाशांना जीव टांगणीला लागला आहे.



ताम्हाणी घाटातील धोकादायक वळणे प्रवाशांच्या मुळावर येत असून ती त्यांच्या जीवावर बेतत आहेत. आंतरराष्ट्रीय दिघी बंदराशी जोडणाऱ्या माणगाव-ताम्हाणी-पुणे मार्गावरील ताम्हिणी घाटाच्या संरक्षक भिंती धोकादायक झाल्या आहेत. अनेक वर्षांपूर्वी या मार्गावर काही ठिकाणी संरक्षण भिंती बांधण्यात आल्या होत्या त्या सध्या कमकुवत झाल्या आहेत, तर अनेक धोकादायक ठिकाणी संरक्षक कठडे नसल्यामुळे प्रवाशांना आपला प्रवास करताना असुरक्षित वाटत आहे. या मार्गांनी अनेक पर्यटक रायगड दर्शनासह कोकण दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात येतात. मुळातच हा मार्ग अनेक ठिकाणी अरुंद आहे.

१९९८-९९मध्ये या रस्त्याचे काम करण्यात आले. त्या वेळी पुणे-दिघी हा रस्ता सार्वजनिक बांधकाम खात्याकडून करण्यात आला. त्यावेळेस काही ठिकाणी संरक्षक भिंतीचे काम डबर सिमेंटमध्ये करण्यात आले होते.

त्याला तब्बल २४ वर्षे लोटली, या संरक्षक भिंती आता कमकुवत झाल्या आहेत. या रस्त्याच्या साईडला खोल दऱ्या आहेत. त्यातच हा मार्ग अरुंद आहे. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनचालकांना धोका जाणवत आहे. काही ठिकाणी अवघड वळणांवर संरक्षणासाठी पत्र्याचे कवच उभारले आहे, तर काही ठिकाणी अवघड वळणांवर कोणत्याही प्रकारचे संरक्षणासाठी बांधकाम करण्यात आलेले नाही.

### पर्यटकांसाठी आकर्षण

*ताम्हिणी घाटातील निसर्गरम्य धबधबे तसेच भिरा येथील देवकुंड हे पर्यटकांचे व ट्रेकर यांचे प्रमुख आकर्षण बनल्यामुळे कोकणात येणारे पर्यटक हे या घाटामध्ये थांबून निसर्गरम्य परिसराचे दर्शन घेऊन पुढील प्रवास करीत असतात, तसेच कोकणात येण्यासाठी हा मार्ग प्रवासाच्या दृष्टीकोनातून जवळ असल्यामुळे सुट्टीच्या कालावधीमध्ये पर्यटकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.*

## निवडक

### दागिने बनविण्याची कार्यशाळा उत्साहात



**पेण** : भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजगता मंत्रालयाची योजना जनशिक्षण संस्थान यांच्या माध्यमातून जोहे येथे बुधवारी (दि. १४) महिलांसाठी शोभिवंत कृत्रिम दागिने बनवण्याची कार्यशाळा घेण्यात आली. संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष गीतांजली ओक, संचालक डॉ. विजय कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याभरात जेएसएसच्या माध्यमातून विविध कौशल्य उपक्रम राबिवले जात आहेत. शोभिवंत कृत्रिम दागिने बनविण्याच्या कार्यशाळेसाठी प्रशिक्षिक नीता मोकल, मोहिनी भोईर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सुकन्या नांदगावकर, वेदांती पाटील व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### 'प्रियदर्शनी'च्या अध्यक्षपदी सिराज पानसरे



**नागोठणे** : नागोठण्यातील प्रियदर्शनी चालक-मालक-वाहक वाहतूक सहकारी संस्थेच्या अध्यक्षपदी संस्थेचे नवनिर्वाचित संचालक आमदार रविशेठ पाटील यांचे खंदे समर्थक भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते सिराज पानसरे तर उपाध्यक्षपदी प्रथमेश काळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. संस्थेच्या कार्यलयात बुधवारी (दि. १४) अध्यक्ष व उपाध्यक्ष पदासाठी झालेल्या बैठकीत दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. या वेळी संस्थेचे सल्लागार नरेंद्र जैन, भाईसाहेब टके, शिवराम शिंदे, सदानंद गायकर, नवनिर्वाचित संचालक बाळासाहेब टके, विठोबा दंत, शैलेश रावकर, झिमा कोकरे, सद्दाम दफेदार, सोहेल नाडकर, काशिनाथ जाधव, नगमा सय्यद, सुरेखा येरुणकर, ॲड. श्रीकांत रावकर, सिद्धेश काळे, गुल्लूशेठ पाटणकर, मैनूबाबा कुरेशी, बिपीन सोष्टे, अजय साळुंखे, वासिम बेडोरे, तात्या पोत्रिक, रयान सिराज पानसरे, संस्थेचे सचिव प्रदीप दुर्वे, लेखनिक शकील शेख, एम. एम. जोंधळे, कर्मचारी मारुती भोसले उपस्थित होते.

# चौक परिसरातील शाळांमध्ये नवागतांचे स्वागत

## पहिला दिवस विविध कार्यक्रमांनी हाऊसफुल्ल

**चौक : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्षाचा शाळांचा पहिला दिवस नवागतांच्या स्वागताने आणि विविध शैक्षणिक उपक्रमाने अतिशय सुंदर वातावरणात झाला. लहान मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ वर्षाचा शाळेतील पहिला दिवस विविध कार्यक्रमांनी हाऊसफुल्ल साजरा झाला. पाल्य, पालक आणि गुरूजन यांच्यातील संवाद आजच्या कार्यक्रमाने सुरू झाला. प्राथमिक शाळा वावंढळ, चौक, कलोते, विनेगाव, आसरे, जांभिवली, लोधिवली, नढाल, भिलवले,वावलें, नानीवली, कांढरोली अशा अनेक गावच्या शाळेत नवगतांचे स्वागत झाले. इ. पहिलीच्या नवीन विद्यार्थी यांचे व त्यांच्या पालकांचे स्वागत प्रत्येक गावाच्या शाळेच्या प्रवेशद्वारावर पुष्प, खाऊ आणि फुगे देऊन करण्यात आले. वाजत गाजत विद्यार्थी पालक, नागरिक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शिक्षक यांनी गावातून नवीन विद्यार्थी यांची दिंडी काढली. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

शाळा पूर्वतयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी शाळा पोषक वातावरण तयार करण्यात आले होते. मुलांच्या विविध प्रकारच्या चाचण्या घेण्यात आल्या. बॉल फेकणे, चित्र रेखाटणे, रंग व चित्र ओळखणे, अंक लिहिणे, मोजणे, वस्तू ओळखणे, मुलांची उंची व वजन मोजण्यात आले. मुलांना पोषण आहाराचे वाटप केले. आहारात गोड जिलेबी पदार्थ देण्यात आला. शेवटी पाठ्यपुस्तक व गणवेश वाटप करण्यात आले.

पूर्वी मुलांना शाळेत दाखल करताना मुलांची रडारड असायची, पण या अनोख्या पद्धतीने शाळा प्रवेश झाल्याने मुलांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता, असेच वातावरण वर्षभर राहील याची खात्री वाटते, असे मुख्याध्यापक संतोष पाटील यांनी सांगितले.

### आरसीएफ कंपनीतर्फे आदिवासींसाठी विविध उपक्रम

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

वनवासी कल्याण आश्रम अलिबाग शाखेच्या वतीने व आरसीएफच्या माध्यमातून आदिवासीवाड्यांवर मोफत आरोग्य शिबिरे, औषध वाटप, महिलांची मोफत रक्त तपासणी, त्यांना पौष्टिक आहार आदी उपक्रम राबविण्यात आले.

वनवासी कल्याण आश्रमाला आरसीएफकडून निरंतर मदत मिळत असते. गेली तीन वर्षे मे महिन्यात आदिवासी बांधवांना कंपनीतर्फे बी-बियाणे वाटप करण्यासाठी सुमारे ९०,००० रुपयांचा निधी दिला गेला. या बियाणांमुळे त्यांची परसबाग फुलली. त्यांना त्यातून तयार होणारे उत्पादन विकून रोजगार मिळाला. कंपनीने संस्थेच्या आदिवासी समाजासाठी सुरू असलेल्या आरोग्य शिबिर तसेच महिलांसाठी रक्त तपासणी, पौष्टिक आहार अशा कार्यक्रमांसाठी यंदा भरघोस निधी संस्थेला दिला.

### रस्त्याच्या साईटपट्टीवर पार्किंग; अपघाताची शक्यता

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर येथील शासकीय रूग्णालय व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाजवळील रस्त्याच्या कडेला चालकांनी पार्किंग बनविले असून यामुळे अपघाताला निमंत्रण दिल्यासारखे आहे.



खालापूर हे तालुक्याचे ठिकाण आहे. येथे रोज शेकडो लोक आपल्या कामासाठी आपल्या खासगी गाड्या घेऊन येत असतात. येथे पार्किंग नाही. त्यामुळे तहसील कार्यालय व पंचायत समितीच्या आवारात अनेकजण आपल्या गाड्या उभ्या करीत आहेत. शहराच्या प्रवेशद्वारात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. लागूनच शासकीय रुग्णालय आहे. दोन्हीच्या मधून रस्ता आहे. एसटी बस आणि नवी मुंबई परिवहन विभागाच्या बसची ये-जा असते. यामुळे येथील संरक्षक भिंतीला लागून अनेक चारचाकी वाहने बेकायदेशिररित्या उभ्या केलेल्या वाहनांमुळे इतर प्रवाशांना वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

यामुळे अपघाताचीही शक्यता आहे. त्यामुळे या बेकायदेशिर पार्किंगवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### घोडपापड येथील ग्रामस्थ नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत

**सुधागड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यात २०२२साली वादळी मुसळधार पावसामुळे जांभूळपाडा ग्रामपंचायत हद्दीतील घोडपापड या आदिवासी वाडीतील लक्ष्मण जाधव यांच्या घराचे मोठे नुकसान झाले. लक्ष्मण जाधव हे वयस्कर असल्याने दिड वर्षे उलटून ही ते आपले घर दुरुस्ती करू शकले नाही. शासनाकडून नुकसानभरपाईच्या प्रतीक्षेत आहेत.



लक्ष्मण जाधव यांच्या घराचे दोन वेळा पंचनामा होऊनही भरपाई मिळालेली नाही. त्यांनी आरटीआय कार्यकर्ते विजयकुमार श्रीरंग यादव याबाबत आपले गाऱ्हाणे मांडले. विजयकुमार श्रीरंग यादव यांनी जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

# माणगावात नेत्रतपासणी शिबिराला प्रतिसाद

## ४८ रुग्णांची तपासणी, १६ रुग्णांवर शस्त्रक्रिया

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे बुधवारी (दि. १४) नेत्रतपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी ४८ रुग्णांची तपासणी करून १६ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. हे शिबिर दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.

या वेळी विजयशेठ मेथा, तनुजा हेमंत मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा, सुप्रिया शिंदे, प्रसाद कांबळे यांच्यासह शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक प्रकाश पाटील व त्यांचे सहकारी रजवाला ठाकूर, ज्योती पाटील, सम्रधी साळवी, कल्पेश सावंत उपस्थित होते.

# मुरूडमध्ये ४५ टक्के भातपेरणी पूर्ण

## चाचणी करूनच बियाणे वापरा -मनीषा भुजबळ

**मुरूड : प्रतिनिधी**

बियाणे हा शेतीचा आत्मा असल्याने शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व बियाणे नीट पारखून निवडावे व त्याची उगवण क्षमता तपासून घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुरूड तालुका कृषी अधिकारी मनीषा भुजबळ यांनी केले. तालुक्यात ३२०० हेक्टर भातलागवड योग्य क्षेत्र असून ४५ टक्के भातपेरणी झाली असल्याची माहिती देण्यात आली.



भातबियाणे उगवण क्षमता तपासणी करणे आवश्यक असून मागील वर्षाचे बियाणे यावर्षी पेरणीसाठी वापरल्यास बियाणे पेरणी योग्य आहे की नाही, हे ठरवता येते, तसेच बियाण्याचे उगवण क्षमतेच्या आधारे बियाण्याचे प्रमाण ठरवता येते.

बियाण्यांचे भौतिक व अनुवंशिक गुणधर्म कळतात. भातबियाणे उगवण क्षमता पाहण्याची सोपी पद्धत अवलंबतांना गोणपाट किंवा वर्तमानपत्र वा सुती कापड घेऊन १०० नग भात बियाणे घेऊन बियाणे पाण्यात टाकून बी तळाशी गेलेल्या बियाणे तपासणीसाठी घ्यावे आणि गोणपाट किंवा वर्तमानपत्रावर पूर्णपणे भिजवून ओली करून अंथरावे. नंतर त्या कापडावर ओळीमध्ये १०×१० (एकूण १००) बियांचा वापर करून १०-१० रांगा करून व्यवस्थितपणे बियाणे ठेवून घ्यावे.

त्यानंतर कापडावरील बियाणे न हलविता हे कापड गुंडाळून घेऊन दोन्ही बाजूस सुतळी ने किंवा रबराने बांधून घ्यावे आणि तीन ते चार दिवस सावलीत ठेवून त्यावर दिवसातून तीन ते चार वेळा हलकेसे पाणी शिंपडावे.

तीन ते चार दिवस झाल्यानंतर उगवण झालेली एक एक रांग मोजून घ्यावी आपण वापरलेल्या १०० बियांपैकी किती बियाण्यास मोड आलेले आहेत असे सदृढ व निरोगी बियाणे मोजून घ्यावेत. १०० बियाण्यांपैकी ज्या बियाण्यास मोड आले आहेत ते म्हणजे बियाण्यांचे उगवण क्षमता होय.

भातबियाणे पेरणीस योग्य आहे की नाही हे ओळखून १०० बियाण्यांपैकी किमान ७० सुदृढ व निरोगी बियाणे मोड आलेले असल्यास सदरील बियाणे पेरणीसाठी योग्य समजावे. बियाण्यांचे उगवण क्षमता जर ७० टक्केपेक्षा कमी असेल तर ते बियाणे पेरणीसाठी वापरू नये, अशी सूचना कृषी अधिकारी भुजबळ यांनी केली.

# खालापुरात सफाई कामगारांना तीन महिन्यानंतर वेतन

**खोपोली : प्रतिनिधी**

वेतन वेळेवर मिळत नसल्यामुळे काम बंद करण्याचा इशारा देताच खालापूर नगरपंचायतीमधील सफाई कामगारांना हक्काचे वेतन मिळाले आहे.



जवळपास तीन महिन्यांपासून नगरपंचायत खालापूरमध्ये सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या तेवीस जणांचे वेतन रखडले होते. वेतन वेळेवर मिळत नसताना देखील सफाई कामगार अहोरात्र मेहनत करीत होते, मात्र वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे सर्वजण हतबल झाले होते. मुलांच्या सुरू झालेल्या शाळा, दर महिन्याचा किराणा तसेच लग्नसराई यामुळे झालेले कर्ज यामुळे वेतनाची प्रतीक्षा वाढली होती. किराणा दुकानदारदेखील रेशन देण्यास नकार देत असल्यामुळे अखेरीस सर्व सफाई कामगारांनी वेतन द्या अन्यथा काम बंद करतो, असा पवित्र घेतल्यामुळे खडबडून जाग आलेल्या नगरपंचायतने दोन महिन्याचे वेतन सफाई कामगारांना दिले आहे.

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या स्वच्छता दूताना विनावेतन महिनो महिना राबवण्याची वेळ येऊ नये, अशी नागरिकांची मागणी आहे.

### स्वच्छतेबाबत सत्कार

**नगरपंचायत खालापूरचा जिल्ह्यात स्वच्छतेबाबत नावलौकिक आहे. महाड पुराच्या वेळीदेखील या सफाई कामगाराचे पथक आठवडाभर पूरग्रस्त भागात राबत होते. शेकडो टन कचरा या सफाई कामगारांनी साफ केला होता. त्यांच्या या कार्याची दखल दिलासा फाउंडेशननेदेखील घेत त्यांचा सत्कार केला होता.**

# पेणमध्ये सर्पमित्रांकडून अजगराला जीवदान

**पेण : प्रतिनिधी**

शहरातील सर्पमित्र योगेंद्र विरकर यांच्या टीमने नाणेकरवाडी येथे आलेल्या ३० किलो ६.५ फुटी अजगराला पकडून जीवदान दिले आहे.



नाणेगाव (कामार्ली) येथे बुधवारी (दि. १४) रात्री १०:२० वा. च्या सुमारास सर्पमित्र योगेंद्र वीरकर यांना मानवी वस्तीत अजगर असल्याची माहिती मिळाली. योगेंद्र विरकर यांनी त्यांचे सहकारी सर्पमित्र दीपेश जोशी, आत्मसखा, चैतन्य गुजर व मयुर यांना अजगर असलेल्या स्पॉटवर जाऊन त्या अजगरास सुखरुप रेसक्यू करण्यास सांगितले. त्याप्रमाणे चारही टीम मेंबर लगोलग निघून घटनास्थळी पोहचले आणि त्या ३० किलो ६.५ फुट अजगरला पकडून सुखरुपपणे जंगलामध्ये सोडून दिले. येथील नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

कोठेही साप दिसल्यास सर्पमित्र योगेंद्र वीरकर यांना आपण (९८५०४२१२४३) या नंबरवर संपर्क करावा, असे आवाहन योगेंद्र विरकर यांनी केले आहे.

# आशिया चषक स्पर्धेची घोषणा

## हायब्रीड मॉडेल अंतर्गत ३१ ऑगस्टपासून थरार

**दुबई : वृत्तसंस्था**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धा २०२३ला ३१ ऑगस्टपासून सुरूवात होणार आहे. आशियाई क्रिकेट परिषदेने (आयसीसी) ट्वीट करून स्पर्धेच्या तारखेची व ठिकाणांची माहिती दिली.

आशिया चषक स्पर्धेबाबत अनेक दिवसांपासून सुरू असलेला वाद आता पूर्णपणे मिटला आहे. ही स्पर्धा आता दोन देशांमध्ये आयोजित केले जाणार आहे. पाकिस्तानमध्ये चार सामने होणार आहेत, तर उर्वरित नऊ सामने श्रीलंकेत होणार आहेत. आशिया चषकाच्या या हंगामात दोन गट असतील. या वेळी आशिया चषक पाकिस्तानात होणार होता, मात्र भारतीय संघाने पाकिस्तामध्ये जाण्यास नकार दिला. या कारणासाठी, हायब्रीड मॉडेल निवडले आहे.

स्पर्धा १७ सप्टेंबरपर्यंत खेळवली जाणार आहे. या स्पर्धेतील १३ सामने भारत, पाकिस्तान, श्रीलंका, बांगलादेश,



अफगाणिस्तान आणि नेपाळ संघांत होणार आहेत. परिषदेने अधिकृत संकेतस्थळावरही याबाबत माहिती दिली. सामन्यांचे वेळापत्रक अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. या स्पर्धेतील भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्याची चाहते आतुरतेने वाट पाहत असतील. या दोन्ही संघांमध्ये अनेक दिवसांपासून द्विपक्षीय मालिका खेळली जात नाही. हे संघ फक्त आयसीसी स्पर्धा किंवा आशिया कपमध्येच आमनेसामने येतात.

१५ वर्षांनंतर आशिया चषकाचे सामने पाकिस्तानात होणार आहेत. २००८मध्ये पाकिस्तानने शेवटच्या आशिया कपचे यजमानपद भूषवले होते. तेव्हा श्रीलंका अंतिम फेरीत भारताचा पराभव करून चॅम्पियन बनला होता. पुढे वनडे विश्वचषक असल्याने यंदाचा आशिया कप वनडे फॉरमॅटमध्ये खेळवला जाणार आहे.

**भारत-पाक महासंग्राम**

आशिया चषकामध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात तीन सामने रंगण्याची शक्यता आहे. साखळी फेरीत पहिली लढत होईल. त्यानंतर सुपर ४मध्ये पुन्हा हे संघ आमनेसामने येतील. जर सुपर ४मध्ये दोन्ही संघांनी गुणतालिकेत आघाडीवर स्थान पटकावले तर फायनल भारत आणि पाकिस्तान यांच्यात होण्याची शक्यता आहे.

## हिमा दास आशियाई क्रीडा स्पर्धेतून बाहेर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई क्रीडा स्पर्धा २०२३चा थरार सुरू होण्यापूर्वीच भारताला मोठा झटका बसला आहे. आगामी सप्टेंबर महिन्यात चीनमध्ये ही स्पर्धा खेळवली जाणार आहे, मात्र या स्पर्धेच्या आधीच भारताला सुवर्ण कन्या हिमा दासच्या रूपात झटका बसला आहे, कारण देशाची स्टार धावपटू आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही. हिमा एप्रिलमध्ये जखमी झाली होती, ज्यातून ती अद्याप बरी झालेली नाही.

दुखापतीमुळे भारताची सुवर्णकन्या हिमा दासआगामी स्पर्धेला मुकणार आहे. भारतीय अथलेटिक्सचे मुख्य प्रशिक्षक राधाकृष्णन नायर यांनी ही माहिती दिली. याआधी २०१८मध्ये हिमाने जकार्ता येथे झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत ४०० मीटरमध्ये रौप्यपदक जिंकले होते.

प्रशिक्षक राधाकृष्णन नायर यांनी सांगितले की, हिमा दासच्या हाताला दुखापत असून पाठीचाही त्रास जाणवत आहे. वैद्यकीय तपासणी सुरू आहे, पण ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या धोरणानुसार ती आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नाही.

## एमआय न्यूयॉर्क संघाच्या कर्णधारपदी किरॉन पोलार्ड

**मुंबई : प्रतिनिधी**

अमेरिकेत १३ जुलैपासून मेजर लीग क्रिकेटच्या पहिल्या हंगामाल सुरुवात होणार आहे. या स्पर्धेसाठी एमआय न्यूयॉर्क फ्रँचायझीने आपल्या संघाबद्दल दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या आहे, ज्यामध्ये संघातील खेळाडू आणि संघाच्या कर्णधाराचे नाव जाहीर करण्यात आले आहे. वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार आणि सध्याचे मुंबई इंडियन्सचा फलंदाजी प्रशिक्षक किरॉन पोलार्डला एमआय न्यूयॉर्क संघाचा कर्णधार नियुक्त केले आहे.

एमएलसी २०२३च्या या हंगामासाठी एमआय न्यूयॉर्क फ्रँचायझीने आपल्या परदेशी खेळाडूंची नावे जाहीर केली, जे या हंगामात खेळताना दिसणार आहेत. यासह फ्रँचायझीने किरॉन पोलार्डला आपल्या संघाचा कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. मुंबई इंडियन्सच्या कुटुंबासोबत पोलार्डची ही नवीन इनिंग असेल.

पोलार्डशिवाय एमआय न्यूयॉर्कमध्ये आणखी आठ परदेशी खेळाडूंचा समावेश करण्यात आला आहे. त्यात ट्रेंट बोल्ट, टीम डेव्हिड, डेवाल्ड ब्रेविस, निकोलस पूरन, राशिद खान, डेव्हिड विज, कगिसो रबाडा आणि जेसन बेहरेनडॉर्फ यांच्या नावांचा समावेश आहे. यातील बहुतेक खेळाडू याआधी मुंबई इंडियन्सकडून खेळले आहेत. पोलार्डने गेल्या वर्षीच आयपीएलमधून निवृत्ती जाहीर केली होती. त्यानंतर त्याला मुंबई इंडियन्सने त्याच्याच संघाचा फलंदाजी प्रशिक्षक बनवले होते, तर राशिद खान दक्षिण आफ्रिकेच्या टी-२० लीगमध्ये एमआय केपटाऊनकडून खेळतो आणि संघाचा कर्णधारही आहे.



## अश्विनने रिव्ह्यूवर घेतला रिव्ह्यू



**चेन्नई : वृत्तसंस्था**

टीम इंडियाचा स्टार स्पिनर रविचंद्रन अश्विन क्रिकेटच्या मैदानावर वेगवेगळे प्रयोग करत असतो. नॉन स्ट्रायकर एंडच्या फलंदाजाला धावबाद करण्यापासून ते रिटायर्ड आउट होण्यापर्यंत तो प्रसिद्धीच्या झोतात राहिला आहे. आता तो रिव्ह्यू घेतल्यामुळे चर्चेत आला आहे. हा प्रकार तामिळनाडू प्रीमियर लीग २०२३मध्ये पाहिला मिळाला आहे. डिंडीगुल ड्रॅगन्स आणि बीए इलेव्हन त्रिची यांच्यातील सामन्यादरम्यान अश्विनने हे केले.

त्रिचीच्या डावाच्या १३व्या षटकात आर. राजकुमारला रविचंद्रन अश्विनने कॉट बिहाइंड आउट केले. फलंदाजाने लगेच रिव्ह्यू घेतला. चेंडू बॅटला लागला नाही म्हणून तिसऱ्या पंचाने मैदानावरील पंचांना आपला निर्णय बदलण्यास सांगितले. बॅट जमिनीवर आदळल्यामुळे आवाज आला होता. हा निर्णय बदलल्यानंतर अश्विनने रिव्ह्यू घेतला आणि मैदानावरील पंचांशी संवाद साधताना दिसला. बॅट जमिनीवरच नाही तर चेंडूलाही लागली, असे तो म्हणत होता, मात्र तिसरे पंच आपल्या निर्णयावर ठाम राहिले.

दरम्यान, अश्विनच्या नेतृत्वाखालील डिंडीगुल ड्रॅगन्सने त्रिचीचा सहा गडी राखून पराभव केला. संघाने १२२ धावांचे लक्ष्य चार गडी राखून पूर्ण केले.

## शिवलाल यादवांकडून मुलाच्या करिअरसाठी माझी कारकीर्द उद्ध्वस्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रिकेटपटू अंबाती रायुडूने क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. आयपीएल २०२३मध्ये तो चेन्नई सुपर किंग्जच्या संघाचा हिस्सा होता. आयपीएलच्या अंतिम सामन्याच्या पूर्वसंध्येला रायुडूने आयपीएलमधून निवृत्त होत असल्याचे जाहीर केले. आयपीएलचा किताब उंचावल्यानंतर तो आता प्रथमच माध्यमांसमोर आला आहे. बीसीसीआयच्या माजी अध्यक्षांनी आपल्या मुलाचे करिअर घडवण्यासाठी आपली कारकीर्द उद्ध्वस्त केल्याचा गंभीर आरोप रायुडूने केला आहे तसेच त्याने माजी मुख्य निवडकर्ते एमएसके प्रसाद यांच्याबद्दल खुलासा केला आहे.

माजी क्रिकेटर आणि बीसीसीआयचे माजी अध्यक्ष शिवलाल यादव यांच्यामुळे मी टीम इंडियासाठी जास्त काळ खेळू शकलो नाही. यादव यांनी आपल्या



### रायुडूचा गंभीर आरोप

मुलाचे करिअर घडवण्यासाठी मला मागे खेचले, असा आरोप रायुडूने केला आहे. तो टीव्ही ९ तेलुगू या वृत्तवाहिनीशी बोलत होता. मी लहान असताना हैदराबाद क्रिकेट असोसिएशनमध्ये राजकारण सुरू झाले होते. शिवलाल यादव यांचा मुलगा अर्जुन यादव याला भारतीय संघात खेळवण्यासाठी मला त्रास दिला गेला. मी अर्जुन यादवपेक्षा चांगला खेळत होतो. त्यामुळेच त्यांनी मला मागे खेचण्याचा प्रयत्न केला, असे रायुडू म्हणाला.

सन २००३-०४मध्ये मी भारत अ संघासाठी चांगली कामगिरी केली होती, पण २००४मध्ये निवड समिती बदलली आणि शिवलाल यादव यांच्या जवळचे लोक त्यात सामील झाले. त्यामुळे मला संधी मिळाली नाही. चार वर्षे त्यांनी माझ्याशी कोणाला बोलूदेखील दिले नाही. शिवलाल यादव यांच्या लहान भावाने मला शिवीगाळही केली. त्यांनी माझा मानसिक छळ करण्याचा प्रयत्न केला, असा खळबळजनक खुलासा रायुडूने केला.

दरम्यान, संघातील इतर खेळाडू माझ्याशी बोलले नाहीत. जे बोलत होते त्यांना संघातून बाहेर फेकले गेले. त्या वेळी माझ्याशी खूप भेदभाव केला गेला. चांगली कामगिरी करण्यासाठी क्रिकेटपटूने खेळासोबतच मानसिकदृष्ट्याही तंदुरूस्त असायला हवे, पण त्यावेळी मी खूप तणावाखाली होतो. म्हणूनच मला हैदराबाद सोडून आंध्र प्रदेशात जावे लागले, असे माजी खेळाडूने अधिक सांगितले.

अंबाती रायुडूला २०१९च्या विश्वचषक संघातून शेवटच्या क्षणी वगळण्यात आले होते. यावर भाष्य करताना त्याने सांगितले की, बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी त्याला विश्वचषकाची तयारी करण्यास सांगितले होते, पण त्या वेळी मुख्य निवडकर्ते एमएसके प्रसाद यांनी रायुडूऐवजी विजय शंकरला पसंती दिली. यानंतर रायुडूने थ्रीडी चष्म्याचा संदर्भ देत उपरोधिक ट्वीट केले, जे चर्चेचा विषय बनले होते.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com